सांध्य दैनिक
# विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

QR कोड स्कॅन करा व आमच्या ग्रुप ला जॉईन व्हा!

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - २५२ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ शुक्रवार दि. ७ नोव्हेंबर २०२५ ❑ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## ‘वंदे मातरम् म्हणजे एक मंत्र, एक ऊर्जा एक स्वप्न, एक प्रेरणा’; पंतप्रधान मोदींचं भाष्य

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७नवी दिल्ली**

भारताचं राष्ट्रीय गीत ‘वंदे मातरम्’च्या निर्मितीला १५० वर्षे पूर्ण झाले आहेत. या निमित्ताने देशभरात विविध कार्यक्रम आयोजित करण्यात येत आहेत. या पार्श्वभूमीवर आज (७ नोव्हेंबर) दिल्लीत ऐतिहासिक कार्यक्रम पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत कार्यक्रम पार पडला आहे. यावेळी ‘वंदे मातरम्’च्या १५० व्या वर्धापन दिनानिमित्त पंतप्रधान मोदी यांनी एक स्मारक टपाल तिकीट आणि एक स्मारक नाणं दखील प्रकाशित केलं.

भारताच्या स्वातंत्र्य लढ्याला प्रेरणा देणाऱ्या ‘वंदे मातरम्’ या गीताचं महत्त्व नवीन पिढीपर्यंत पोहोचवणं हे या कार्यक्रमाचा उद्देश असल्याचं सांगण्यात आलं आहे. तसेच या कार्यक्रमात बोलताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी महत्वाचं भाष्य देखील केलं आहे. ‘वंदे मातरम्, हे शब्द एक मंत्र, एक ऊर्जा, एक स्वप्न, एक संकल्प आहेत’, असं नरेंद्र मोदींनी म्हटलं आहे.

वंदे मातरम्, हे शब्द एक मंत्र, एक ऊर्जा, एक स्वप्न, एक संकल्प आहेत. वंदे मातरम् हे शब्द भारतमातेची भक्ती आहेत, भारतमातेची आराधना आहेत. एवढंच नाही तर वंदे मातरम् हे शब्द आपल्याला इतिहासात परत घेऊन जातात आणि आपल्या



वर्तमानाला नवा आत्मविश्वास आणि आपल्या भविष्याला प्रेरणा देतात. वंदे मातरम् हे शब्द म्हणजे असा कोणताही संकल्प नाही जो साध्य करता येत नाही, असं कोणतंही ध्येय नाही जे आपण साध्य करू शकत नाही, म्हणजेच वंदे मातरम्, असं पंतप्रधान मोदींनी म्हटलं आहे.

वंदे मातरम् हे शब्द आपल्यामध्ये एक आत्मविश्वास निर्माण करतात. आपल्याला हे शब्द बळ देतात. हे गीत पिढ्यानपिढ्या भारतीयांच्या हृदयात उत्साह आणि देशभक्ती निर्माण करतं. वंदे मातरम् केवळ एक गीत नव्हतं तर स्वातंत्र्यलढ्याचा आवाज होता. ज्यामुळे प्रत्येक क्रांतिकारी भारत माता की जय म्हणू लागला. याच भावनेने देशाला गुलामगिरीतून मुक्त होण्याची ताकद दिली. गुलामगिरीच्या काळ्या काळात, वंदे मातरम् हा भारतमातेच्या मुक्तीचा मंत्र बनला. या गाण्याने प्रत्येक भारतीयाच्या मनात हा संकल्प जागृत केला की भारतमातेची मुले स्वतःचं भाग्य स्वतः बनवती, असं मोदींनी म्हटलं आहे.

पंतप्रधान मोदी पुढे म्हणाले की, हे येणारे वर्ष देशाच्या एकतेचं, अखंडतेचं आणि राष्ट्रीय अभिमानाचं प्रतीक बनेल. हा उत्सव भारताला स्वातंत्र्य मिळवून देणाऱ्या आणि आजही आपल्याला प्रेरणा देणाऱ्या आत्म्याला पुनरुज्जीवीत करेल. वंदे मातरम् हा केवळ इतिहास नाही, तर तो भारताच्या अस्तित्वाची ओळख आहे, असंही पंतप्रधान मोदींनी म्हटलं आहे.

## व्हीव्हीपॅटचा वापर करायचा नसेल तर बॅलेट पेपरवर निवडणुका घ्या

### उच्च न्यायालयाचे निवडणूक आयोगाला निर्देश

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७नागपूर**

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आगामी निवडणुका मतदार पडताळणी पावती प्रणाली ( व्हीव्हीपॅट) शिवाय घेण्याच्या राज्य निवडणूक आयोगाच्या निर्णयाला आव्हान देणाऱ्या काँग्रेसचे राष्ट्रीय सचिव प्रफुल्ल गुडघे यांच्या याचिकेवर नागपूर खंडपीठाने शुक्रवारी राज्य निवडणूक आयोगाला नोटीस बजावली.

न्यायालयाने आयोगाला चार दिवसांच्या आत या संदर्भात आपले म्हणणे स्पष्ट करण्याचे निर्देश दिले आहेत. ही याचिका न्यायमूर्तींच्या खंडपीठासमोर शुक्रवारी सुनावणी झाली. याचिकाकर्त्यांच्या वतीने ड. पवन दहाट आणि ड. निहालसिंग राठोड यांनी जोरदार युक्तिवाद करताना




म्हटले की, सर्वोच्च न्यायालयाने यापूर्वीच विविध प्रकरणांमध्ये व्हीव्हीपॅट प्रणालीची गरज अधोरेखित केली आहे.मतदानाच्या प्रक्रियेत पारदर्शकता आणि मतदारांचा विश्वास टिकवण्यासाठी ही प्रणाली आवश्यक असल्याचे सर्वोच्च न्यायालयाने नमूद केले आहे.

याचिकेमध्ये म्हटले आहे की, इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे म्हणजेच इव्हीएम वापरताना मतदाराला आपले मत नोंदले गेले आहे की नाही याची खात्री मिळत नाही. व्हीव्हीपॅट प्रणालीमुळे प्रत्येक मतदाराला काही क्षणांसाठी त्याने कोणाला मत दिले याची पावती स्वरूपात झलक दिसते, ज्यामुळे मतदान प्रक्रियेवर विश्वास दृढ होतो. मतदार पडताळणी ही केवळ तांत्रिक सुविधा नसून ती लोकशाहीतील पारदर्शकतेचा पाया आहे, असे याचिकाकर्त्यांनी नमूद केले आहे.

## भटक्या कुत्र्यांना तात्काळ हटवा सर्वोच्च न्यायालयाचे महत्त्वपूर्ण आदेश

**विदर्भ प्रजसत्ताक**
**दि.७ नवी दिल्ली**

गेल्या काही महिन्यांपासून भटक्या कुत्र्यांचा मुद्दा चर्चेत आला होता. भटक्या कुत्र्यांनी केलेल्या हल्ल्यामध्ये लहान मुले, वृद्ध आणि सामान्य नागरिक मोठ्या प्रमाणावर जखमी होत असल्याचं समोर आलं होतं. या पार्श्वभूमीवर एकीकडे भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त केला जावा, अशी मागणी केली जात होती, तर दुसरीकडे श्वानप्रेमींकडून कुत्र्यांबाबत भूतदयेच्या दृष्टीकोनातून विचार करावा, अशी मागणी केली जात होती. हे प्रकरण थेट देशाच्या सर्वोच्च न्यायालयात पोहोचलं. शेवटी सर्वोच्च न्यायालयात सविस्तर सुनावणी झाल्यानंतर आज न्यायालयाने याबाबत महत्त्वपूर्ण आदेश दिले आहेत.




**भटक्या कुत्र्यांबाबत सर्वोच्च न्यायालयाचा आदेश**

न्यायमूर्ती विक्रम नाथ, न्यायमूर्ती संदीप मेहता व न्यायमूर्ती एन. व्ही. अंजारिया यांच्या खंडपीठाने आज भटक्या कुत्र्यांच्या मुद्द्यावर आदेश जारी केले. यानुसार, सर्व सार्वजनिक ठिकाणांवरून भटक्या कुत्र्यांना ताबडतोब हटवण्यात यावं, असं न्यायालयाने म्हटलं आहे. शैक्षणिक संस्था, रुग्णालये, क्रीडा संकुल, बस स्थानक व डेपो, रेल्वे स्थानक अशा ठिकाणच्या सर्व भटक्या कुत्र्यांना ताबडतोब तिथून हलवून त्यांच्यासाठीच्या विशेष निवारा व्यवस्थेमध्ये ठेवावं असे आदेश न्यायालयाने दिले आहेत. तसेच, त्याआधी या कुत्र्यांची नसबंदी व लसीकरण देखील केलं जावं, असंही न्यायालयाने नमूद केलं आहे.

**जबाबदारी संबंधित पालिकेची आणि अधिकाऱ्यांची**

भटक्या कुत्र्यांना सार्वजनिक ठिकाणांहून तात्काळ हटवण्याचे निर्देश न्यायालयाने दिले असून त्याच्या अंमलबजावणीची जबाबदारी स्थानिक प्रशासन व्यवस्थेवर देण्यात आली आहे. येत्या दोन आठवड्यांमध्ये अशा सर्व सार्वजनिक ठिकाणांची यादी प्रशासनाने तयार करावी आणि त्यानुसार कार्यवाही करण्यात यावी, असंही न्यायालयाने बजावलं आहे. आठ आठवड्यांनंतर १३ जानेवारी २०२६ रोजी केलेल्या कारवाईसंदर्भातला अहवाल सादर करण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने प्रशासनाला दिले आहेत.

**संस्थांवरही टाकली ‘ही’ जबाबदारी**

दरम्यान, सर्वोच्च न्यायालयाने स्थानिक प्रशासनाबरोबरच सार्वजनिक संस्थांवरही जबाबदारी सोपवली आहे. शैक्षणिक संस्था, रुग्णालये, क्रीडा संकुले, बस स्थानक, रेल्वे स्थानक अशा संस्थांच्या व्यवस्थापनाने या मोहिमेवर देखरेख ठेवण्यासाठी एका व्यक्तीची नेमणूक करावी. संबंधित संस्थेचा परिसर स्वच्छ ठेवून भटके कुत्रे संस्थेच्या परिसरात प्रवेश करणार नाहीत, याची खातरजमा करण्याची जबाबदारी या अधिकाऱ्यावर असेल, असं न्यायालयाने नमूद केलं.

**जिथून पकडलं, तिथे त्या कुत्र्यांना पुन्हा सोडू नका**

दरम्यान, ज्या ठिकाणहून भटक्या कुत्र्यांना पकडून त्यांचं निर्बिजीकरण केलं आहे, त्यांना पुन्हा त्या भागात सोडू नये, असे निर्देशही न्यायालयाने यावेळी दिले आहेत. आम्ही पूर्ण विचाराअंती हे आदेश दिले आहेत की ज्या ठिकाणाहून भटक्या कुत्र्यांना पकडलं आहे, तिथे त्यांना पुन्हा सोडण्यात येऊ नये. कारण असं केल्यास अशा सार्वजनिक ठिकाणी या कुत्र्यांमुळे होणारा मनस्ताप कमी करण्याच्या मूळ भूमिकेलाच धक्का बसेल, असं न्यायालयाने यावेळी म्हटलं.

## पार्थ पवारांच्या कंपनीचा जमीन व्यवहार वादात

### पार्थ यांनी स्वतः सही केलेली संबंधित कागदपत्रेही समोर, तरी गुन्ह्यात नाव नाही

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७पुणे**

अजित पवार यांच्या कुटुंबाशी संबंधित जमीन व्यवहार प्रकरणाने मोठं वादळ निर्माण केलं आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे पुत्र पार्थ पवार यांच्या अमेडिया कंपनीकडून १,८०० कोटी रुपये किंमतीची जमीन केवळ ३०० कोटींमध्ये खरेदी करण्यात आली. या व्यवहारामुळे शासनाची सुमारे १५२ कोटी रुपयांची फसवणूक झाल्याचा आरोप आहे. विशेष म्हणजे या व्यवहारात केवळ ५०० रुपयांचे मुद्रांक शुल्क भरले गेले. या प्रकरणात गंभीर अनियमितता आढळल्याने सरकारने कारवाईचा



बडगा उगारला असून, दुय्यम निबंधक रवींद्र तारू यांना निलंबित करण्यात आले आहे. या घडामोडींमुळे राज्यातील राजकीय वातावरण तापले असून विरोधकांनी अजित पवार यांच्या राजीनाम्याची मागणी केली आहे. दरम्यान, या प्रकरणी बावधान पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पुण्यातील कोरेगाव पार्कमधील या जागेच्या विक्रीत अनेक नियमांचा भंग झाल्याचे आरोप आहेत. या प्रकरणात पोलिसांनी तक्रारीवरून तिघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. तक्रारदाराने दाखल केलेल्या एफआयआरमध्ये अमेडिया कंपनीचा भागीदार दिग्विजय अमरसिंह पाटील, जमीन विक्रीसाठी मुखत्यार असणारी शीतल तेजवानी आणि निलंबित दुय्यम निबंधक आर.बी. तारू यांच्याविरोधात गुन्हे नोंदवले आहेत. त्यांच्यावर भारतीय दंड संहितेच्या कलम ४२० (फसवणूक), ४०९ (विश्वासघात), ३३४ आणि ३१६(५) तसेच इतर कलमांखाली गुन्हे दाखल झाले आहेत. मात्र, पार्थ पवार किंवा त्यांच्या कंपनीचं नाव या एफआयआरमधून वगळण्यात आलं आहे, ही बाब विरोधकांच्या रोषाचं कारण ठरली आहे.

तक्रारीनुसार, ६ कोटींच्या मुद्रांक शुल्काचा भरणा न केल्याचा आरोप आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याचे आदेश दिले असून, अतिरिक्त मुख्य सचिव विकास खारगे यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती स्थापन होणार आहे.

## मनोज जरांगेंच्या हत्येच्या कट रचल्याच्या आरोपांवर धनंजय मुंडेंची प्रतिक्रिया; म्हणाले, माझं आणि त्यांचं वैर नाही

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७बीड**

आरक्षणासाठी मोठे आंदोलन उभे करणारे नेते मनोज जरांगे पाटील यांनी आज पत्रकार परिषद घेत त्यांच्या हत्येचा कट रचण्यात आल्याबद्दल मोठा खुलासा केला आहे. त्यांच्या हत्येचा कट माजी मंत्री धनंजय मुंडे यांनी रचल्याचा आरोप जरांगे यांनी केला आहे. यानंतर राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे नेते आणि माजी मंत्री धनंजय मुंडे यांनी पत्रकार परिषद घेत या आरोपांना उत्तर दिले आहे.

मनोज जरांगे यांच्या आरोपांच्या पार्श्वभूमीवर घेतलेल्या पत्रकार परिषदेत बोलताना धनंजय मुंडे म्हणाले की, मंत्री म्हणून मला जेव्हा मनोज जरांगे यांचं उपोषण सोडायला लावलं, त्यावेळी माझ्या हाताने त्यांनी एकदा उपोषण देखील सोडले आहे. तसं माझं आणि त्यांचं



वैर नाही. जीवनात कधीच, १७ तारखेची सभा सोडता, मनोज जरांगे यांच्याविरोधात मी एका शब्दानेही बोललेलो नाही. एक आरोपही केला नाही. अशा परिस्थितीत एकीकडे सर्व समाजाला सोबत घेऊन जात असताना, हा व्यक्ती कसाच आता आवरत नाही, म्हणून यालाच पूर्णपणे राजकीय, सामाजिक एवढंच नाही तर मनोज जरांगेंना वाटतं की धनंजय मुंडे या पृथ्वीतलावरच नसावा, यासाठी ही धडपड आहे, असे धनंजय मुंडे म्हणाले आहेत.तुम्ही हाकेंना मारलं, मारामारीची प्रवृत्ती कोणाची आहे? तुम्ही वाघमारेंना मारलं असे किती उदाहरणे देऊ. आता मात्र काही लोक मला भेटले, मी कट केला, मीच याच्या पाठिशी आहे. इथे परळीची जनता बसली आहे माझ्याकडून त्यांना धोका? माझा आणि त्यांचा काय बांधाला बाध आहे? माझं आणि त्यांचं वैर काय? माझं आणि त्यांचं वैर एवढंच आहे की तुम्ही ओबीसीच्या आरक्षणाला धक्का लावू नका. मराठा आरक्षण घ्या, त्या लढाईत आम्ही तुमच्या खांद्याला खांदा लावून लढू, असेही धनंजय मुंडे पुढे बोलताना म्हणाले.

## अजित पवारांच्या अडचणी वाढल्या

### एका मुलाचे नाव जमीन भ्रष्टाचारात, तर दुसऱ्याचे दारू व्यवसायात; काँग्रेसचा गंभीर आरोप

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७मुंबई**

उपमुख्यमंत्री अजित पवार पुन्हा एकदा वादाच्या भोवऱ्यात सापडले आहेत. यावेळी त्यांच्या दोन्ही मुलांवर गंभीर आरोप झाले असून, राज्याच्या राजकारणात मोठी खळबळ उडाली आहे. पार्थ पवार यांच्या अमेडीया होल्डिंग्ज एलएलपी या कंपनीने १८०० कोटी रुपयांच्या बाजारभावाची जमीन केवळ ३०० कोटी रुपयांत विकत घेतल्याचा आरोप काँग्रेसने केला आहे. या प्रकरणामुळे अजित पवार अडचणीत सापडले असतानाच, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी त्यांच्या दुसऱ्या मुलावर



म्हणजेच टँगो दारू कंपनीशी संबंधित भ्रष्टाचाराचा आरोप केला आहे.


हर्षवर्धन सपकाळ यांनी पत्रकार परिषदेत आरोप करताना म्हटलं की, अजित पवार स्वतःची संपत्ती लपवण्यासाठी आणि तुरुंगवास टाळण्यासाठी भाजपात गेले आहेत. पण पक्ष बदलल्यानंतरही त्यांचे कारनामे सुरूच आहेत. दोन्ही मुलांना ते नंबर दोनचे धंदे करायला लावतात आणि स्वतः दस नंबर बनून उपमुख्यमंत्रीपदाची खुर्ची घट्ट पकडून बसले आहेत. सपकाळ म्हणाले की, अजित पवार यांच्या एका मुलाचे नाव भ्रष्टाचारात आलंय, तर दुसऱ्याचा दारू व्यवसायात. त्यांच्या एका मुलाची कंपनी पुण्यातील सरकारी जमिनीच्या व्यवहारात अडकली आहे, तर दुसऱ्याची टँगो नावाची दारू कंपनी आहे, ज्याला अजित पवार यांनी अबकारी मंत्री म्हणून निर्णय घेत संरक्षण दिलं, असा आरोप त्यांनी केला.

## माझ्या हत्येच्या कटामागे धनंजय मुंडे मनोज जरांगे पाटील यांचे गंभीर आरोप

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७जालना**

मराठा आरक्षणासाठी मोठे आंदोलन उभे करणारे नेते मनोज जरांगे पाटील यांच्या हत्येचा कट रचण्यात आल्याची बाब समोर आली आहे. जरांगे पाटील यांनी देखील या वृत्ताला दुजोरा दिला आहे. यानंतर आज पत्रकार परिषदेच्या माध्यमातून मनोज जरांगे पाटील यांनी त्यांच्या हत्येचा कट माजी मंत्री धनंजय मुंडे यांनी रचल्याचा आरोप केला आहे.

मनोज जरांगे पाटील म्हणाले की, मुख्यमंत्र्यांनी धनंजय मुंडे यांची चौकशी करावी. कारण आरोपींसोबत त्यांच्या बैठका झाल्या आहेत. धनंजय मुंडे यांनी खून करण्याचा आणि घातपात करण्याचा कट रचला आहे.



बीड आणि जालना जिल्ह्यातील सर्व प्रतिष्ठित नेत्यांनी ही गोष्ट त्यांच्या कानाने ऐकली आहे. त्यामुळे तुम्ही पक्षातील लोकांना विचारून घ्या की जरांगे पाटील सांगत होते ते खरे आहे का? मला ही गोष्ट कळाली. त्यानंतर याबाबतची माहिती मी पोलीस प्रशासनाला दिली. कारण मुख्य सूत्रधारच धनंजय मुंडे आहेत. ज्यांच्या जीवाला धोका आहे, त्यांना सरकारने संरक्षण देणे गरजेचे आहे.धनंजय मुंडेंवर गंभीर आरोप करताना जरागे-पाटील पुढे म्हणाले की, मराठा समाजाने शांत रहावे. माझ्या गाडीचा अपघात करत मला ठार मारण्याचा प्रयत्न होता. बीडचा कांचन नावाचा माणूस आहे, तो धनंजय मुंडे यांचा कार्यकर्ता आहे. त्यांनीच माझ्या विरोधात हे षडयंत्र रचण्याचे काम केले आहे. मराठा समाजाच्या नेत्यांनी हा विषय गांभीर्याने घेणे गरजेचे आहे. अशा वृत्तीचा आपल्याला नाय नाट करावा लागेल. आरक्षण, राजकारण हा विषय वेगळा आहे. पण जीवावर उठणे हा विषय खूप गंभीर आहे.

## संपादकीय ......

# नारीशक्तीचा 'विश्व'विजय!

*'म्हारी छोरियां छोरों से कम हैं के'. आमिर खानच्या 'दंगल' चित्रपटातील हा बहुचर्चित संवाद खरा ठरला तो २ नोव्हेंबरला, रविवारी रात्री. महिला एकदिवसीय क्रिकेट विश्वचषकात भारतीय महिला संघाने दक्षिण आफ्रिकेच्या महिला क्रिकेट संघाचा अंतिम सामन्यात पराभव करत १३ व्या एकदिवसीय क्रिकेट विश्वचषकावर पहिल्यांदा नाव कोरले. या मोठ्या आणि आशादायी विजयाचा जागर क्रिकेट चाहत्यांनी रात्रभर साजरा केला. ढोल ताशांच्या गजरात अनेक जणांनी विजयी जल्लोष केला. याशिवाय स्त्री-पुरुष समानतेमध्ये भारत तितकासा मागे नसला तरी देशाला समान पातळीवर आणून प्रगती करण्याच्या प्रक्रियेत ही एक महत्त्वाची घटना घडली. वूमन क्रिकेट असोसिएशनच्या स्थापनेला पुढील वर्षी १०० वर्षे पूर्ण होतील. १९२६ साली या असोसिएशनच्या स्थापनेनंतर १९३३-३४ या वर्षामध्ये ऑस्ट्रेलिया आणि इंग्लंड यांच्यात पहिली कसोटी मालिका खेळवण्यात आली. भारतीय महिला क्रिकेट असोसिएशनची स्थापना १९७३ मध्ये उशिराच झाली. भारतीय महिला संघाने १९७६ मध्ये त्यांचा पहिला कसोटी सामना वेस्ट इंडीजविरुद्ध खेळला. पाटणा येथील मोईन-उल-हक स्टेडियमवर, शांता रंगास्वामी यांच्या नेतृत्वाखाली नोव्हेंबर १९७६ मध्ये वेस्ट इंडीजविरुद्ध भारतीय महिला संघाने पहिला कसोटी विजय नोंदविला.*

*भारतीय महिला क्रिकेट असोसिएशन ही महिला क्रिकेटची प्रशासकीय संस्था, आंतरराष्ट्रीय महिला क्रिकेट परिषदेशी संलग्न होती. महिला क्रिकेट विकसित करण्याच्या आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेच्या पुढाकाराचा एक भाग म्हणून, भारतीय महिला क्रिकेट असोसिएशनचे २००६-०७ मध्ये भारतीय क्रिकेट नियामक मंडळामध्ये विलीनीकरण करण्यात आले. त्यानंतर आतापर्यंत भारतीय महिला संघाने अनेक चढउतार पाहिले. अनेक विजय थोडक्यात हुकल्याचे पाहिले आणि अखेर २ नोव्हेंबरला क्रिकेट विश्वचषकाला गवसणी घातलीच. महिला क्रिकेट विश्वचषकाला १९७३ साली सुरुवात झाली. १९८८ सालपर्यंतच्या महिला एकदिवसीय विश्वषकात ऑस्ट्रेलिया आणि इंग्लंड संघांची 'दीदीगिरी' होती. विजेते आणि उपविजेते म्हणून या दोन संघांच्याच पोरींचा दरारा होता. बाकी कोणाला एन्ट्री मिळेल याची शक्यता कमीच. परंतु, त्यानंतर १९९३, १९९७ आणि २००९ साली न्यूझीलंड क्रिकेट संघाने उपविजेतेपदापर्यंत मजल मारली. तर २००० साली न्यूझीलंड क्रिकेट संघाने विश्वचषक जिंकून ही दीदीगिरी मोडीत काढण्याचा प्रयत्न केला. २००५ आणि २०१७ साली भारतीय महिला क्रिकेट संघ अंतिम फेरीपर्यंत पोहोचला. तर २०१३ साली वेस्ट इंडिज संघाने आणि आता २०२५ साली दक्षिण आफ्रिका उपविजेती ठरली. हा सर्व डाटा समोर मांडण्याचा प्रपंच याचसाठी की इंग्लंड आणि ऑस्ट्रेलियाचे वर्चस्व मोडीत काढत इतर महिला क्रिकेट संघ देखील गेल्या काही वर्षात उभे राहिले.*

*ऑस्ट्रेलिया संघाचा वचक इतका की एकूण १३ स्पर्धांमध्ये एकट्या ऑस्ट्रेलिया संघाने ७ वेळा, इंग्लंडने ४ वेळा तर भारत आणि न्यूझीलंडला एकदा विश्वचषक जिंकण्यात आतापर्यंत यश आले आहे. २०२५ सालचे हे विश्वचषक विजेतेपद मिळवताना भारतीय संघाने अनेक अडथळे पार केले. आधी आफ्रिका, ऑस्ट्रेलिया आणि इंग्लंड संघांकडून सलग तीन पराभव झाल्यानंतर भारतीय संघ कमबॅक करेल, अशी आशा कमीच होती. परंतु, भारतीय महिला संघाने फिनिक्स भरारी घेऊन सेमी फायनलमध्ये बलाढ्य ऑस्ट्रेलिया संघाचा ५ विकेट्स राखून पराभव करून पुरुष क्रिकेटमध्ये मने गुंतलेल्या क्रिकेट रसिकांना महिला क्रिकेटकडे लक्ष देण्यास भाग पाडलं. तसेच अंतिम फेरीत संपूर्ण विश्वचषक स्पर्धेत फॉर्मात असलेल्या आफ्रिका संघाला पराभूत करून पहिल्यांदा विश्वचषकाला गवसणी घातली. या विश्वचषक विजयानंतर २०१७ साली केवळ ९ धावांनी विश्वचषक हुकलेल्या भारतीय क्रिकेट चाहत्यांनी एकच जल्लोष केला. कर्णधार हरमनप्रित कौर, मानधना, शेफाली वर्मा, दिप्ती शर्मा, रुचा घोष, जेमिमा, रेणुका सिंग, क्रांती गौड, अमनज्योत कौर, राधा यादव, नल्लापुरेड्डी चराणी सार्यांनीच उत्कृष्ट कामगिरी करत भारतीय क्रिकेट चाहत्यांना हा आनंद दिला. याशिवाय या यशात संघाचे मुख्य प्रशिक्षक आणि माजी क्रिकेटपटू अमोल मुजुमदार, सपोर्ट स्टाफ यांचा सिंहाचा वाटा होता. त्यांच्या प्रशिक्षणाखाली भारतीय मुली जिद्दीने लढल्या.*

*भारतीय महिला संघाने मिळवलेला हा विजय भारतीय महिला क्रिकेटसाठी महत्त्वाचा आणि ऊर्जा देणारा निश्चितच आहे, शिवाय देशात प्रत्येक क्षेत्रात काम करणार्या प्रत्येक स्त्रीसाठी तितकाच महत्त्वाचा आहे. इतकी वर्षे पुरुष संघाच्या तुलनेत महिला क्रिकेटला मोठे फॅन वलय मिळाले नव्हते. शिवाय त्यातून होणारी आर्थिक प्रगती पुरुष संघाएवढी निश्चितच नव्हती. पण गेल्या काही वर्षांत आयपीएलच्या धर्तीवर वुमन प्रिमियर लीगसारख्या स्पर्धा सुरू झाल्यापासून महिला क्रिकेटचीदेखील आर्थिक प्रगती होत आहे. आता तर क्रिकेटचा विश्वचषक जिंकल्यानंतर महिला क्रिकेटला सोन्याचे दिवस येणार आहेत. निरनिराळ्या जाहिराती आणि स्पर्धांमध्ये आगामी काळात आधीपेक्षा जास्त महिला खेळाडूंना संधी उपलब्ध होणार आहेत. या मोठ्या यशामुळे देशातील पालकांचा महिला क्रिकेटकडे बघण्याचा दृष्टिकोन अधिकच सकारात्मक होताना दिसेल. त्यामुळे आगामी काळात अनेक दर्जेदार खेळाडू भारतीय महिला संघात खेळताना दिसतील. तसेच त्यांच्या क्रिकेट कारकिर्दीत त्यांना पुरुष क्रिकेटपटूंसारखे आर्थिक यश आणि प्रसिध्दी मिळेल. आता हेच सोन्याचे दिवस महिलांशी संबंधित इतर खेळांमध्ये आणि क्षेत्रांमध्ये यावेत हीच आशा आहे.*

# तरुणांनो, ड्रोन पायलट व्हा; मोफत प्रशिक्षण मिळवा

## शासनाच्या अमृत संस्थेचा उपक्रम : मिळणार रोजगाराची दिशा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.७अमरावती :** खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील युवक-युवतींना रोजगाराच्या नव्या दिशेने वाटचाल करता यावी, या उद्देशाने महाराष्ट्र शासनाच्या राज्य संस्था महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत) मार्फत ड्रोन पायलटसाठी मोफत प्रशिक्षण दिले जाणार आहे. या उपक्रमामुळे तरुणांना आधुनिक तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण देऊन रोजगारक्षम बनवणे आणि स्वावलंबनासाठी नवी दिशा उपलब्ध करून देणे, हा प्रमुख उद्देश आहे.




अमरावती जिल्ह्यात हा कार्यक्रम राबविण्यात येणार असून, या अंतर्गत दहा दिवसांचे डीजीसीएकृत मान्यताप्राप्त प्रशिक्षण दिले जाईल. प्रशिक्षणाद्वारे ड्रोन उड्डाण, नियंत्रण, सर्व्हेक्षण व तांत्रिक बाबींचे प्रत्यक्ष मार्गदर्शन केले जाईल. या प्रशिक्षणामुळे तरुणांना विविध क्षेत्रांतील संधींचे दरवाजे खुले होतील.

विविध अभ्यासक्रमांचा समावेश

सदर प्रशिक्षणात एकाच वेळी अनेक अभ्यासक्रमांचा समावेश आहे. प्रशिक्षणाच्या माध्यमातून ड्रोन उड्डाण, देखभाल, मोजणी,छायाचित्रण तसेच चित्रफित तसेच मॅपिंग, शेती व आपत्ती व्यवस्थापन यांसारख्या विविध क्षेत्रांतील ड्रोन वापराबाबत सखोल माहिती देण्यात येईल.

प्रशिक्षण अमरावती शहरासह जिल्ह्यातील इतर प्रमुख ठिकाणी आयोजित केले जाईल.

पात्रता आणि अर्ज प्रक्रिया

खुल्या प्रवर्गातील ज्यांना शासकीय योजनांचा लाभ मिळत नाही, अशा समाजघटकांतील युवक-युवती या प्रशिक्षणासाठी पात्र आहेत. अर्जदार महाराष्ट्रातील रहिवासी असावा, वय १८ ते ५५ वर्षे दरम्यान असावे, तसेच दहावी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

या ठिकाणी करावा अर्ज

इच्छुक उमेदवारांनी ़.ारहरर्रीींं.ीस.ळप या संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज करावा. अर्जासोबत छायाचित्र, ओळखपत्र, अधिवास व शैक्षणिक कागदपत्रे अपलोड करावीत. फिटनेस प्रमाणपत्र व अर्जाची प्रत अमृत संस्थेच्या स्थानिक कार्यालयात सादर करावी.

अंतिम मुदत आणि संपर्क

पहिल्या टप्प्यातील अर्ज करण्याची अंतिम तारीख ५ नोव्हेंबर २०२५ असून, प्रशिक्षणाचा प्रारंभ १०नोव्हेंबर २०२५ पासून अमरावती येथे होणार आहे.अधिक माहितीसाठी अमृत कार्यालय, आशीर्वाद , टोपे नगर,मालटेकडी समोर, अमरावती येथे तसेच अमृत अमरावती जिल्हा व्यवस्थापक केदार गोगरकर ९११२२२७६३५ , अमरावती जिल्हा उप व्यवस्थापक ऋषिकेश कथलकर ७२४९४५११५२ तसेच अमृत सखी अश्विनी कोळेश्वर ९५२७३१७०६८ यांचेशी संपर्क करावा.




## मूड सुधारण्यापासून वजन कमी करण्यापर्यंत ब्लॅक कॉफी आहे बेस्ट

**दि.७विदर्भ प्रजासत्ताक**

ब्लॅक कॉफी कॅफिनचा प्रमुख स्त्रोत आहे. अनेक जणांची सकाळ ब्लॅक कॉफीशिवाय होत नाही. ब्लॅक कॉफी दिवसातून एकदा प्यायल्याने शरीराला अनेक फायदे होतात. मूड सुधारण्यापासून वजन कमी करण्यापर्यंत ही कॉफी उत्तम पर्याय आहे. त्यामुळे ब्लॅक कॉफी केवळ एक पेय नसून निरोगी आरोग्यासाठी फायदेशीर आहे




**वेट लॉस** -ब्लॅक कॉफी मेटाबॉलिझम वाढवते आणि फॅट्स कमी करण्यास मदत करते. कॅफीनमुळे शरीराची उष्णता निर्माण होण्याची प्रक्रिया सक्रिय होते. ज्यामुळे शरीरातील अतिरिक्त कॅलरी जाळण्याची प्रक्रिया जलद होते.

**मूड सुधारण्यासाठी उपयुक्त** -ब्लॅक कॉफी मूड सुधारण्यासाठी फायदेशीर असते. कॅफीन मेंदूमधील डोपामाईनचे प्रमाण वाढवते, ज्यामुळे सकारात्मकता येते आणि डिप्रेशन दूर होते. त्यामुळे सकाळी तुम्ही ब्लॅक कॉफी घेऊ शकता.

**मेंदूचे कार्य सुधारते** -काही अभ्यासानुसार ब्लॅक कॉफी नियमितपणे घेतल्यास स्मरणशक्ती सुधारते. तसेच यातील ऍंटी-ऑक्सिडंट्स आणि न्यूरोप्रोटेक्टिव्ह गुणधर्म मेंदूच्या आरोग्यासाठी उपयुक्त असतात.

**हे महत्त्वाचे** -ब्लॅक कॉफी वजन कमी करणे, मूड सुधारणे, चांगली स्मरणशक्ती राखणे यासाठी एक उत्तम पर्याय आहे. मात्र, याचा अतिरेक टाळावा. योग्य प्रमाणात सेवन केल्यास ब्लॅक कॉफी तुम्हाला निरोगी जीवनशैली नक्कीच मिळवून देईल.

**कशी बनवाल? साहित्य** - इन्स्टंट कॉफी पावडर - १ चमचा पाणी - १ कपसाखर -चवीनुसार

**कृती** - एका पातेल्यात पाणी घालून हे पाणी छान उकळून घ्यावे.पाणी उकळल्यावर त्यात साखर, कॉफी पावडर घाला आणि उकळी आणा.जवळपास दोन मिनिटे उकळल्यानंतर कॉफीचा रंग काळसर तुम्हाला दिसेल.तयार ब्लॅक कॉफी सर्व्ह करावी.

# राज्यात १४ लाख हेक्टरवर उसाची लागवड; यंदा साखरेचे बंपर उत्पादन होणार




**दि.७ विदर्भ प्रजासत्ताक**

महाराष्ट्रासह देशात पडलेल्या जोरदार पावसामुळे साखरेचे बंपर उत्पादन होणार असल्याचा दावा राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाने केला आहे.

यंदा देशात एकूण ३४५ लाख टन साखर उत्पादन होण्याची शक्यता आहे. तर, गेल्या वर्षीच्या तुलनेत महाराष्ट्रात साखरेचे उत्पादन २९ टक्क्याने वाढण्याची शक्यता आहे.

महासंघाचे व्यवस्थापकीय संचालक प्रकाश नाईकनवरे यांनी सांगितले की, यंदा देशभरात चांगला पाऊस पडला आहे.

यामुळे साखरेचे भरघोस उत्पादन होण्याची शक्यता आहे. यंदा ३४५ लाख टन साखरेची निर्मिती होऊ शकते. मागच्या वर्षी २९६ लाख टन साखर तयार झाली होती. मोठ्या पावसामुळे उत्पादन वाढण्याची शक्यता आहे.कर्नाटकात सहा टक्के पेरणीक्षेत्र वाढले आहे. मात्र, उत्तरप्रदेशात पेरणीक्षेत्र तीन टक्क्यांनी घटले असले तरी उत्पादन चांगले होण्याची शक्यता आहे, असेही नाईकनवरे यांनी सांगितले.

**महाराष्ट्रात यंदा २९ टक्के उत्पन्न वाढण्याची शक्यता**

महाराष्ट्र आणि कर्नाटक साखर उत्पादनाच्या बाबतीत आघाडीवर राहणार आहेत.

महाराष्ट्रात १३० लाख टन साखर निर्मिती होण्याची शक्यता आहे.




गेल्या वर्षी ९३ लाख टन साखरेचे उत्पादन झाले होते.

यंदा तब्बल २९ टक्क्याने उत्पन्न वाढण्याची शक्यता आहे.

कर्नाटकातही पंधरा ते वीस टक्के उत्पादन वाढण्याची शक्यता आहे.

महत्त्वाचे म्हणजे, महाराष्ट्रात यंदा उसाचे पेरणी क्षेत्र वाढले आहे.

गेल्या वर्षी १३.८२ लाख हेक्टरमध्ये ऊस लावण्यात आला होता.

यंदा १४.७१ लाख हेक्टरमध्ये उसाची लागवड झाली आहे.

# भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेसाठी ३० नोव्हेंबर पर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.७अमरावती,**

राज्यातील अनुसूचित जाती आणि नवबौद्ध प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी पण शासकीय वसतिगृहात प्रवेश न मिळालेल्या पात्र विद्यार्थ्यांसाठी ) 'भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना' सुरु आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी दि. ३० नोव्हेंबर २०२५ पर्यंत ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक आहे. दिवसेंदिवस वाढत असलेल्या व्यावसायिक व अव्यावसायिक महाविद्यालयांची संख्या आणि मर्यादित शासकीय वसतिगृहांची जागा लक्षात घेऊन, अनेक विद्यार्थी निवासाच्या समस्येमुळे उच्च शिक्षणापासून वंचित राहतात. ही अडचण दूर करण्यासाठी, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने ही योजना सुरु केली आहे. या योजनेंतर्गत ५० टक्के पेक्षा जास्त गुण प्राप्त असलेल्या इयत्ता ११ वी, १२ वी तसेच १२ वी नंतरच्या अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांना भोजन, निवास आणि इतर शैक्षणिक सुविधांसाठी आवश्यक रक्कम त्यांच्या आधार संलग्न बँक खात्यात थेट जमा केली जाते. स्वाधार योजनेचा लाभ घेण्यासाठी विद्यार्थ्यांनी प्रथम शासकीय वसतिगृह प्रवेशासाठी अर्ज केलेला असावा आणि मर्यादित प्रवेशक्षमतेमुळे त्यांना वसतिगृहात प्रवेश मिळालेला




नसावा. तसेच, विद्यार्थी स्थानिक रहिवासी नसावा. पात्र विद्यार्थ्यांनी सामाजिक न्याय विभागाच्या https:// hmas.mahait.org या संकेतस्थळावर त्वरित ऑनलाईन अर्ज करावा. ऑनलाईन अर्ज केल्यानंतर त्याची हार्ड कॉपी आणि सर्व आवश्यक कागदपत्रांची साक्षांकित प्रत सहायक आयुक्त, समाज कल्याण, अमरावती यांच्या कार्यालयात ३० नोव्हेंबरपर्यंत जमा करावा. अधिक माहितीसाठी समाज कल्याण कार्यालय, अमरावती (दूरध्वनी क्रमांक ०७२१-२६६१२६१) येथे संपर्क साधावा, असे आवाहन सहायक आयुक्त आर. व्ही. जाधवर यांनी केले आहे.

# जिल्ह्यात स्क्रब टायफसबाबत खबरदारी बाळगण्याचे आरोग्य विभागाचे आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.७अमरावती-**

अमरावती जिल्ह्यात 'स्क्रब टायफस' या संसर्गजन्य आरोग्य विभागाने प्रतिबंधात्मक उपाययोजना तातडीने सुरु केल्या आहेत. 'ओरिएंटा त्सुत्सुगामुशी' नावाच्या जिवाणूमुळे होणारा हा आजार 'माईट' नावाच्या विशिष्ट कीटकाच्या चाव्यातून पसरतो. तीव्र ताप, डोकेदुखी, अंगदुख या आजाराची मुख्य लक्षणे आहेत.या पार्श्वभूमीवर, जिल्हा हिवताप अधिकारी डॉ. शरद जोगी यांच्या नेतृत्वाखालील पथकांनी बाधित गावांमध्ये जलद ताप सर्व्हेक्षण आणि कीटक सर्व्हेक्षण सुरू केले आहे. झुडपांमध्ये वास्तव्य करणाऱ्या माईटच्या नियंत्रणासाठी टेमीफॉस आणि मॅलीथिऑन




पावडरचा वापर करून कीटकनाशक फवारणी केली जात आहे. वाढलेले गवत आणि अनावश्यक झुडपे काढून टाकण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. नागरिकांनी पूर्ण बाह्यांचे कपडे वापरणे, खुल्या जागी शौचास जाणे टाळणे आणि घराजवळ स्वच्छता राखून कीटकनाशक औषधांचा वापर करणे आवश्यक आहे, असे आवाहन आरोग्य विभागाने केले आहे. कोणतीही लक्षणे आढळल्यास त्वरित जवळच्या आरोग्य केंद्रात तपासणी करून घ्यावी.

## अक्षरा घोरमाडे जिल्हास्तरावर अबॅकस स्पर्धेत तृतीय

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.७तिवसा** - तळेगाव ठाकूर येथील जिल्हा परिषद शाळेची विद्यार्थिनी अक्षरा सुनील घोरमाडे हिने आपल्या बुद्धिमत्तेच्या जोरावर अबॅकस स्पर्धेत तृतीय अमरावती जिल्ह्यातून तिसरा क्रमांक मिळवित गावाचे नाव उज्ज्वल केले आहे. एव्हरेस्ट अबॅकस अक्ॅडमी, अमरावती यांच्या वतीने नुकतीच विद्यार्थ्यांसाठी ४५ वी नॅशनल




लेव्हल चॅम्पियनशिप स्पर्धा देशमुख लॉन, शेगाव नाका येथे आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत संपूर्ण जिल्हाभरातून तब्बल दोन हजार विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता. त्यामधून अक्षरी घोरमेडि हिने तृतीय क्रमांक मिळविला. या यशाबद्दल तिचे ग्रामस्थ, शिक्षकांनी कौतुक केले आहे.दैनिक विदर्भ प्रजासत्ताक कडून अक्षरा ला खूप खूप शुभेच्छा!!

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

# विदर्भ प्रजासत्ताक

क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

शुक्रवार दि. ७ नोव्हेंबर २०२५

शहर/ग्रामिण

# गुन्हे शाखेची धडक कारवाई; चोरीचा ऑटो व सुटे भाग जप्त

**गाडगेनगरातील ऑटो चोरी प्रकरणाचा तपास गतीमान**

## पोलिसांच्या तपासातून उघडकीस आले चोरीच्या ऑटोचे जाळे




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७अमरावती**

गाडगेनगर हद्दीतून चोरी गेलेल्या एका ऑटोचा गुन्हे शाखा पोलिस शोध घेत होते. दरम्यान पोलिस शोधात जमिल कॉलनी भागात पोहोचले. त्यावेळी पोलिसांना त्या ठिकाणी शोध घेण्यासाठी गेलेल्या ऑटोसह अन्य एक ई रिक्षा या दोन वाहनांसह अनेक वाहनांचे सुटे भाग सापडले आहे. पोलिसांनी एका भंगार व्यावसायिकाच्या घरातून चोरी गेलेल्या लाल रंगाच्या ऑटोचे सुटे भाग ताब्यात घेतले असून उर्वरित सुटे भाग ज्या वाहनांचे आहे, त्याचाही तपास सुरू केला आहे. ही कारवाई पोलिसांनी गुरुवारी दुपारी केली आहे. अब्दुल मुफिज अब्दुल मुजीब (२५, रा.जमील कॉलनी, अमरावती) असे ताब्यात घेतलेल्या भंगार व्यावसायिकाचे नाव आहे. गाडगेनगर पोलिसांनी गुरुवारी ऑटो चोरीचा गुन्हा दाखल केला. त्या गुन्ह्याचा समांतर तपास करत असताना एका भंगारच्या दुकानात एक वाहन स्क्रॅप करण्यात येत असल्याची माहिती गुन्हे शाखेला मिळाली. त्याआधारे भंगार दुकान मालक अब्दुल मुफिस अब्दुल मुजिद याला ताब्यात घेण्यात आले. त्याच्या घरातून कोतवाली पोलिस ठाण्यात नोंद चोरीच्या गुन्ह्यातील ऑटोची बॅटरी व काही सुटे भागदेखील मिळून आले. तेथून महावितरणच्या वीज वाहिनीचे ल्युमिनियम तार व इतर साहित्य सुद्धा मिळून आल्याने आणखी काही गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता आहे. अशाच प्रकारचे आणखी कोणी स्क्रॅप व्यावसायिक आहेत का, याचा गुन्हे शाखा सखोल तपास करत आहे.

दोन दिवसांपासून गुन्हे शाखेच्या पथकाकडून स्क्रॅप घेणाऱ्या लोकांची तपासणी सुरू केली आहे. त्यातून चोरीचे बरेच गुन्हे उघडकीस येत आहेत. शहरातील चोरी जाणारे वाहने बेकायदेशीर स्क्रॅप करणाऱ्या काही लोकांकडून खरेदी करून त्याची विल्हेवाट लावत असल्याचे निष्पन्न होत आहे. ही कारवाई गुन्हे शाखेचे पीआय संदीप चव्हाण, एपीआय अमोल कडू, एपीआय मनीष वाकोडे व त्यांच्या पथकाने केली आहे.

# जिल्हास्तरीय युवा महोत्सवाचे १९ नोव्हेंबरला आयोजन




**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.७ अमरावती,** जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयातर्फे येथे दि. १९ नोव्हेंबर रोजी जिल्हास्तरीय युवा महोत्सव घेण्यात येणार आहे. महोत्सवात श्रीमती विमलाबाई देशमुख सभागृह, डी. एड. कॉलेज आणि शिवाजी विज्ञान महाविद्यालयात विविध कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहे. सदर युवा महोत्सव हा सांस्कृतिक आणि नवोपक्रम या संकल्पनेवर आधारीत असणार आहे. या महोत्सवात अमरावती जिल्ह्यातील युवक-युवती विविध स्पर्धांमध्ये सहभागी होऊ शकतील. यासाठी विहीत नमुन्यातील अर्ज जिल्हा क्रीडा अधिकारी यांच्या कार्यालयात किंवा रीरींरींळवीसारळश्र.लो या मेलवर पाठवावे लागतील. तसेच ूलहरीरीं.सींं.ळप या संकेतस्थळावर नोंदणी करणे बंधनकारक आहे.सांस्कृतिक स्पर्धेतील लोकगीत आणि लोकनृत्यात १० जणांना सहभाग घेता येईल. लोकनृत्यासाठी रेकॉर्ड केलेले संगीत वापरण्यास परवानगी नाही. कौशल्य विकास स्पर्धेत कथालेखन (मराठी, हिंदी व इंग्रजी, १००० शब्दांत - सहभागी संख्या ३), चित्रकला (सहभागी संख्या २), वक्तृत्व स्पर्धा (इंग्रजी व हिंदी - सहभागी संख्या २) आणि कविता (सहभागी संख्या ३) सहभागी घेता येणार आहे. चित्रकला स्पर्धेसाठी नशामुक्त युवा, युवकांसाठी आरोग्यदायी जीवनशैली, तर वक्तृत्व स्पर्धेत भारतातील आणीबाणीचा काळ आणि संविधानाचे उल्लंघन, लोकशाही व लोकशाही मुल्यांचे संरक्षण हे विषय आहेत. नवोपक्रम ट्रॅक विज्ञान प्रदर्शनात युवक आणि विद्यार्थ्यांना त्यांचे अभिनव विज्ञान आणि तंत्रज्ञान प्रकल्प सादर करण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात येणार आहे. या व्यतिरिक्त विकसित भारत चॅलेंज ट्रॅक, डिझाईन फॉर भारत आणि हॅक ऑफ सोशल कॉज यावर आधारित उपक्रम आयोजित करण्यात येणार आहेत.

युवा महोत्सवात सहभागी होणाऱ्या स्पर्धकांसाठी वयोमर्यादा ही १५ ते २९ वर्षांपर्यंत राहणार असून दि. १२ जानेवारी २०२६ रोजी वयाची गणना करण्यात येणार आहे. स्पर्धेसाठी अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत दि. १५ नोव्हेंबर आहे. स्पर्धक महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा. विहित नमुन्यातील इंग्रजीमध्ये ओळखपत्र, आधारकार्ड आणि जन्म तारखेचा दाखला, ही कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे. इच्छुकांनी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, तपोवन चौक विद्यापीठासमोर, मार्डी रोड, अमरावती येथे कार्यालयीन वेळेत अर्ज सादर करावेत. महोत्सवात प्रथम क्रमांक प्राप्त करणाऱ्या युवक-युवतींची निवड विभागस्तरीय युवा महोत्सवासाठी आणि त्यानंतर राज्यस्तरीय युवा महोत्सवासाठी केली जाईल. युवा महोत्सवात युवकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी गणेश जाधव यांनी केले आहे.

# गोडबोले स्मृती सेवा प्रतिष्ठेच्या पुरस्कारासाठी प्रज्ञा प्रबोधिनीची निवड

## जितेंद्रनाथ महाराजांच्या हस्ते २३ नोव्हेंबरला केले जाणार वितरण




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७अमरावती-**

विदर्भातील सुपरिचित व्यक्तिमत्व तसेच वैद्यकीय क्षेत्रातील सेवेसाठी नावलौकीक प्राप्त असे डॉ. रमेशपंत गोडबोले यांच्या स्मृतीप्रित्यर्थ दिल्या जाणाऱ्या प्रतिष्ठेच्या पुरस्कारासाठी यावर्षी येथील प्रज्ञा प्रबोधिनीची निवड करण्यात आल्याची माहिती आयोजक संस्थेच्या विश्वस्तांनी आज, गुरुवारी येथे माध्यमांना दिली. श्रमिक पत्रकार भवनात माध्यम प्रतिनिधींशी बोलताना उपाध्यक्ष मोहन काटे म्हणाले, यावर्षीच्या पुरस्काराचे वितरण रविवारी २३ नोव्हेंबर रोजी, स्थानिक श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या स्व. सोमेश्वर पुसतकर सभागृहामध्ये सायंकाळी ५ वाजता प.पू. आचार्य जितेंद्रनाथ महाराजांच्या शुभहस्ते केले जाणार आहे. पुरस्काराचे स्वरुप १ लाख रुपयांची गौरव राशी, स्मृतिचिन्ह व मानपत्र असे आहे.

मागील वर्षीचा पुरस्कार संत अच्युत महाराज हार्ट हॉस्पीटला देण्यात आला होता. तर यावर्षीचा पुरस्कार अमरावती येथील सेवा प्रकल्प प्रज्ञा प्रबोधिनीला देण्याचे निवड समितीने एकमताने ठरविले आहे. प्रज्ञा प्रबोधिनी ही संस्था अमरावती जिल्ह्यातील पारधी समाजासाठी मागील २२ वर्षापासून सेवा कार्य करते आहे. पुरस्कारासाठी निवड करताना संबंधित व्यक्ती अथवा संस्थेला तशी निकड असावी, हे आवर्जून पाहिले जात असून त्या व्यक्ती किंवा संस्थेचे कार्य अधिकाधिक लोकांपर्यंत पोहचले जावे, हा उद्देश बाळगला जातो, हेही यावेळी स्पष्ट करण्यात आले. यावेळी डॉ. रमेश गोडबोले स्मृती प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष मोहन काटे, सहसचिव सोपान गोडबोले, विश्वस्त अतुल गायगोले, अनंत कौलगीकर, अभय देव आदी उपस्थित होते.

डॉ. रमेशपंत गोडबोले हे येथील जगप्रसिद्ध हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष होते. वैद्यकीय क्षेत्रासह ते आध्यात्मिक प्रांतही जपायचे. त्यांची किर्तने ही अजरामर झाली आहेत. त्यांनी झिरी येथील श्री दत्त मंदिर, बडनेरा जुन्या वस्तीतील श्रीराम मंदिर, अंबापेठमधील श्री गोपाळकृष्ण मंदिर, श्री अंबादेवी मंदिर, श्री एकवीरा देवी मंदिरात कीर्तन सेवा दिली आहे. बडनेरा येथील जुन्या वस्तीतील त्यांचे रुग्णालयात समाजातील सर्व स्तरातील रुग्णांना उत्तम वैद्यकीय उपचार मिळायचे. त्यांनी तहहयात अत्यल्प दरात रुग्णसेवा केली. त्यांच्या प्रदीर्घ वैद्यकीय कारकिर्दित त्यांचा देशभरातील अनेक तज्ज्ञांशी निकटचा संपर्क होता. बडनेरा येथे त्यांच्या पुढाकारानेच अद्ययावत अशी संत गाडगेबाबा रक्तपेढी सुरु करण्यात आली आहे. या रक्तपेढीद्वारे रुग्णांना गुणवत्तेच्या सर्व पातळ्यांवर उत्तम सेवा देणे अविरत सुरु आहे.

# मागणी असणाऱ्या रोजगारक्षम प्रशिक्षणाची निवड करावी-जिल्हाधिकारी आशिष येरेकर




**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.७ अमरावती,:** युवका मधील कौशल्य विकसित करण्यासाठी विविध प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात येत आहे. कौशल्य विकास योजनेतून प्रशिक्षणासाठी निधी उपलब्ध करून देण्यात येते. यावर्षीच्या प्रशिक्षण कार्यक्रमात जिल्ह्यात मागणी असणाऱ्या रोजगारक्षम प्रशिक्षणाची निवड करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी दिले. जिल्हाधिकारी कार्यालयात आज किमान कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रमाचे प्रशिक्षण लक्ष्य वाटप करण्याबाबत जिल्हास्तरीय समिती सभा पार पडली. यावेळी कौशल्य विकास विभागाचे उपायुक्त दत्तात्रय ठाकरे, सहायक आयुक्त प्रांजली बारस्कर यांच्यासह समितीचे सदस्य उपस्थित होते. जिल्हाधिकारी श्री. येरेकर यांनी जिल्हा नियोजन समितीच्या निधीमधून यावर्षी प्रशिक्षणावर १ कोटी रूपये खर्च करण्यात येत आहे. युवकांचे कौशल्य वाढविण्यासाठी प्रशिक्षण हे आवश्यक असून आवश्यकतेप्रमाणे निधी देण्यात येईल. जिल्ह्यात मागणी असणाऱ्या मनुष्यबळाची माहिती घेऊन प्रशिक्षण कार्यक्रम ठरविण्यात यावेत. यासाठी चांगल्या दर्जाच्या प्रशिक्षण संस्थांची निवड करण्यात यावी. प्रशिक्षणानंतर प्रामुख्याने रोजगाराचा प्रश्न येत असल्याने यातील प्रशिक्षणार्थ्यांना मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमांतर्गत कर्ज उपलब्ध करून देण्यात यावे. यासाठी त्यांना बँकांशी संलग्न करून द्यावे. जिल्हा नियोजनमधून यावर्षी बचतगटांना एक लाख रूपये देण्यात येणार आहे. त्यामुळे किसान ड्रोनच्या प्रशिक्षणामध्ये महिलांना प्राधान्य द्यावे. प्रशिक्षणानंतर बचतगटाच्या माध्यमातून ड्रोन खरेदी केल्यास महिलांना रोजगाराचे साधन उपलब्ध होऊ शकेल. जिल्ह्यात प्रामुख्याने कृषी आधारीत उद्योगासाठी प्रशिक्षण देण्यात यावे. यासाठी कृषि विकास केंद्रांना सहभागी करून घ्यावे. यात कमी खर्चात उद्योग सुरू करता येतील, असे प्रशिक्षण कार्यक्रम घेण्यात यावे. शहरी भागात उद्योजकांना प्रशिक्षित लेखापालाची गरज आहे. त्यामुळे यात कार्यरत संस्थांच्या मदतीने प्रशिक्षण दिल्यास युवकांना रोजगार उपलब्ध होऊ शकेल, असे त्यांनी सांगितले. यावेळी जागर करीअरचा, अल्पमुदतीचे रोजगारक्षम अभ्यासक्रम आदींचा आढावा घेण्यात आला.

# २७ व २८ डिसेंबर २०२५ ला 'अक्षरक्रांती जिल्हा साहित्य महोत्सवा'चे आयोजन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.७ नागपूर :** मराठी भाषा विभाग, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ व महाराष्ट्र शासन अनुदानित 'अक्षरक्रांती जिल्हा साहित्य महोत्सवा'चे आयोजन महात्मा फुले शिक्षण संस्था सभागृह रेशीमबाग, नागपूर येथे कला गौरव संस्था व अक्षरक्रांती फाऊंडेशनच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केला आहे. राम गणेश गडकरी प्रतिष्ठान प्रायोजित हा साहित्य महोत्सव असणार आहे. साहित्य महोत्सवाचे स्वागताध्यक्ष मा. डॉ. गिरीष गांधी (अध्यक्ष, वनराई फाऊंडेशन) हे राहणार आहेत. नुकतीच सावनेर येथे राम गणेश गडकरी निवासस्थानी मा. डॉ. गिरीष गांधी यांच्या अध्यक्षतेखाली आयोजन समितीची बैठक पार पडली. या बैठकीत जेष्ठ कथाकार मा. वसंत वाहोकर यांची साहित्य महोत्सवाचे अध्यक्ष म्हणून एकमताने निवड झाली. तसेच विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष मा. प्रदीप दाते यांची उद्घाटकपदी निवड करण्यात आली आहे.उद्घाटन सत्राला महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे सदस्य तथा दै.महाराष्ट्र टाइम्सचे संपादक मा. श्रीपाद अपराजित तथा माजी सदस्य विलास सिंदगीकर प्रमुख अतिथी असतील. विशेष उपस्थिती म्हणून प्रसिद्ध कादंबरीकार व कथाकार मा. उर्मिला देवेन टोक्यो (जपान) तसेच सुप्रसिद्ध कवी मनोज भारशंकर, अबुधाबी (यूएई) यांची विशेष उपस्थिती राहणार आहे. साहित्य महोत्सवाच्या उद्घाटन सत्रात देश-विदेशातील मराठी साहित्यिकांच्या कथा, कविता, वैचारिक लेख, समीक्षा इत्यादींचा समावेश असलेली स्मरणिका तसेच साहित्यिक मंडळींच्या डझनभर पुस्तकांचे प्रकाशन होणार आहे. समारोपीय सत्राला प्रमुख अतिथी म्हणून महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे सदस्य मा. डॉ. प्रमोद मुनघाटे तथा अखिल भारतीय मराठी साहित्यमंडळाचे सदस्य मा. डॉ.




गजानन नारे तसेच जेष्ठ साहित्यिक मा. तीर्थराज कापगते हे प्रामुख्याने उपस्थित राहणार आहेत.दोन दिवसीय साहित्य महोत्सव एकूण अकरा सत्रात संपन्न होणार आहे. उद्घाटन सत्राच्या सुरुवातीला 'महाराष्ट्राची लोकधारा' हा सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित असून यात भूपाळी, वासुदेव आला, भारूड, पोवाडा, लावणी, दिंडी यांचे आयोजन केले आहे. 'ग्रामीण संस्कृती दर्शन' हा कार्यक्रमाचे सादरीकरण कला गौरव संस्थेची चमू करणार आहे.या दोन दिवसीय साहित्य महोत्सवात 'प्राथमिक शिक्षण हे मातृभाषेमधूनच असायला हवं' या विषयावर परिसंवाद होणार असून 'शेती हा उद्योग झाल्याशिवाय आत्महत्या थांबणार नाहीत', या विषयावर चर्चासत्र आयोजित केले जाणार आहे. बाल कवीसंमेलन, गझल संमेलन, वऱ्हाडी कवीसंमेलन, निमंत्रितांचे कवीसंमेलन, कथाकथन, प्रकट मुलाखत, नवोदितांचे कविसंमेलन इत्यादी अकरा सत्र राहणार आहेत. संत्रानगरीच्या नागपूरकर मंडळींना हिवाळ्याच्या गुलाबी थंडीत साहित्यिक मेजवानी मिळणार आहे.

सभेला प्रामुख्याने आयोजन समितीचे तथा अक्षरक्रांती फाऊंडेशनचे अध्यक्ष मा. शंकर घोरसे, उपाध्यक्ष मा. गणेश भाकरे, सचिव तथा कला गौरव संस्थेचे अध्यक्ष डॉ. संगीता बानाईत, सहसचिव मा. प्रभाकर तांडेकर 'प्रदत्त', कोषाध्यक्ष मा. भागवत बानाईत, सदस्य मा. देवेंद्र काटे, मा. सचिन सुकलकर, मा. वंदना घोरसे, ड्. अरविंद लोधी, मा. बाबा निमजे, मा. संजय टेंभेकर, प्रा.कोल्हे, मा. वर्षा ढोके, मा.अमीन सय्यद इत्यादी प्रामुख्याने उपस्थित होते.

# कौंडण्यपुरात दहीहंडी सोहळ्याला उसळला भाविक भक्तांचा सागर

## आचार्य जितेंद्रनाथ महाराजांचे प्रबोधन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.७कौंडण्यपुर -** माता रुक्मिणीचे माहेरघर व भगवान श्रीकृष्णाचे सासर असलेल्या कौंडण्यपुरात गुरुवारी दुपारी ४.३० वाजता कार्तिक पौर्णिमेच्या निमित्ताने दहीहंडी सोहळा पार पडला. या सोहळ्यादरम्यान वारकऱ्यांवर दह्याचा प्रसाद उधळण्यात आला. या वेळी वारकऱ्यांचा मोठा उत्साह पाहायला मिळाला. कौंडण्यपूर येथील कार्तिक उत्सवासाठी विशेषत: उत्सवाच्या समारोप प्रसंगी आयोजित दहीहंडीला जिल्ह्याच्या विविध भागातून शेकडो वारकऱ्यांच्या अनेक दिंड्या येथे दाखल होतात. वर्धा नदीत आंघोळ केल्यानंतर श्री विठ्ठल-रुक्मिणीचे दर्शन घेतल्यानंतर वारकरी त्यांच्या भगव्या पताका, दिंड्यांसह दहीहंडी कार्यक्रमाला उपस्थित राहिले. यात मोठ्या संख्येत गावकऱ्यांचाही समावेश होता. त्यामुळे कौंडण्यपूर येथे आज भाविकांचा मेळा भरल्याचे दिसून आले.

कौंडण्यपूर येथे कार्तिक उत्सवात दरवर्षी हजारोंच्या संख्येत भाविक हजेरी लावत असतात. आषाढी एकादशी व कार्तिक महोत्सव हे येथील दोन प्रमुख उत्सव असल्यामुळे संपूर्ण जिल्ह्यातून भाविक याप्रसंगी उपस्थित राहतात.




सर्वप्रथम सकाळी विधिवत श्री विठ्ठल रुक्मिणी संस्थान येथे महाभिषेक व आरती करण्यात आली. त्यानंतर माता रुक्मिणीच्या पालखीसह टाळ, मृदंग आणि रुक्मिणीच्या जयघोषाने संपूर्ण पालख्यांची नगर प्रदक्षिणा झाली. त्यानंतर दुपारी श्री विठ्ठल रुक्मिणी संस्थानात लक्ष्मण महाराज बोधीगावकर यांचे काल्याचे कीर्तन झाले. नंतर संजय महाराज ठाकरे यांनी रुक्मिणीचा जयघोष केला. या वेळी व्यासपीठावर आचार्य जितेंद्रनाथ महाराज यांची उपस्थिती होते.

आ. राजेश वानखडे, माजी आ. दादा केचे, भाजप जिल्हाध्यक्ष रवीराज देशमुख, सुधीर दिवे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सचिव सदानंद साधू यांनी केले. त्यानंतर या दहीहंडी सोहळ्याला खा. बळवंत वानखडे, भाजप जिल्हाध्यक्ष रवीराज देशमुख, आ. राजेश वानखडे, संजय देशमुख, सरपंच प्रेमदास राठोड, गौरी देशमुख, पूजा आमले, मंदिर समितीचे उपाध्यक्ष वसंत डाहे, विश्वस्त ठाकरे यांच्यासह सर्व पदाधिकारी व विश्वस्त यांच्यासह अंबा- रुक्मिणी सांस्कृतिक महोत्सव समितीचे सर्व पदाधिकारी तसेच हजारो वारकरी, भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

विविध मंदिरांमध्ये महाप्रसादाचे आयोजन कार्तिक महोत्सवाच्या समारोपाला दहीहंडीच्या आधी कौंडण्यपूर येथील विविध मंदिरांत दिंडीसह दाखल होणाऱ्या हजारो वारकरी, भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. भाविकांना अन्नदान करण्याच्या उद्देशाने अनेकजण स्वेच्छेने मंदिरांमध्ये धान्य, भाजीपाला, तेल, मसाले दान करत असतात. वर्षातून एकदा आयोजित होणाऱ्या या सोहळ्यात कोणतीही उणीव राहू नये, यासाठी मंदिर संस्थानांद्वारेही विशेष नियोजन केले जाते. भाविकांना महाप्रसादासह पिण्याचे शुद्ध पाणी देण्यात आले. तसेच त्यांच्या विश्रांतीची व्यवस्थाही करण्यात आली होती.

# अमरावती महानगरपालिकेची ट्रान्सपोर्ट नगर परिसरात मोठ्या प्रमाणात अतिक्रमणांवर कारवाई

## पहिल्या टप्प्यात १२५ अनधिकृत दुकाने हटविली

**विदर्भ प्रजासत्ताक दि.७अमरावती**

अमरावती शहरातील वाढत्या अतिक्रमणावर आळा घालण्यासाठी अमरावती महानगरपालिका प्रशासनाने निर्णायक पाऊल उचलले आहे. आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांच्या निर्देशानुसार आज ट्रान्सपोर्ट नगर परिसरात मोठ्या प्रमाणात अतिक्रमण निर्मूलन मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेत अनधिकृत बांधकामे, टिनशेड दुकाने आणि खोके यांवर मोठ्या प्रमाणावर कारवाई करण्यात आली.ट्रान्सपोर्ट नगर हा परिसर दीर्घकाळापासून विविध व्यापाऱ्यांनी व्यापलेला असून, येथे साधारणतः ३०० दुकाने असल्याची माहिती आहे. त्यापैकी अनेक दुकाने व टिनशेड रचना परवानगीशिवाय उभारण्यात आल्या होत्या. पहिल्या टप्प्यात आज सुमारे १२५ अनधिकृत दुकाने आणि टिनशेड पाडण्यात आले. या






कारवाईदरम्यान अनधिकृत खोके व शेड हटविण्यात आले असून, ही कारवाई पुढील काही दिवस सतत सुरू राहणार असल्याचे महापालिकेने स्पष्ट केले आहे.कारवाईसाठी अतिक्रमण विभाग, बाजार परवाना विभाग आणि पोलीस विभाग यांनी संयुक्तपणे पथके तयार केली होती. संपूर्ण कारवाईदरम्यान तीन जेसीपी मशीन आणि तीन मोठे ट्रक सतत कामावर तैनात होते. पोलिसांनी घटनास्थळी मोठा बंदोबस्त ठेवत कारवाईदरम्यान कोणताही अनुशासनभंग होऊ नये याची काळजी घेतली.महानगरपालिकेचे अधिकाऱ्यांनी सांगितले की, शहरातील सार्वजनिक रस्ते, फूटपाथ आणि वाहतूक मार्ग व्यापणाऱ्या अतिक्रमणामुळे नागरिकांना मोठ्या प्रमाणात अडचणी येत आहेत. वाहतुकीस अडथळा निर्माण होतो, तसेच स्वच्छतेवरही परिणाम होत आहे. त्यामुळे प्रशासनाने अतिक्रमण हटविण्याचा निर्णय घेतला असून, ही मोहीम टप्प्याटप्प्याने शहरातील सर्व भागांमध्ये राबविण्यात येईल.आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी नागरिकांना आवाहन केले आहे की, कोणीही अनधिकृत बांधकामे करू नयेत, अन्यथा त्यांच्यावर कठोर कारवाई केली जाईल.

शहर स्वच्छ, सुबक आणि नियोजनबद्ध ठेवण्यासाठी महानगरपालिकेच्या प्रयत्नांना नागरिकांनी सहकार्य करावे, असेही त्यांनी म्हटले आहे.महानगरपालिकेच्या अतिक्रमण पथकाने दिलेल्या माहितीनुसार, पुढील काही दिवसांत ट्रान्सपोर्ट नगर परिसरातील उर्वरित १७५ अनधिकृत दुकाने देखील हटविण्याची प्रक्रिया सुरू करण्यात येणार आहे.

नागरिक व व्यापाऱ्यांनी स्वतःहून अनधिकृत बांधकामे दूर करून प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.या कारवाईमुळे परिसरातील रस्ते मोकळे होऊन वाहतूक व्यवस्थेत सुधारणा होण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

# माहुली जहागीरच्या लाचखोर सरपंच प्रीती बुंदीले अखेर अपात्र

## लाचखोर पतीचे समर्थन हेच सरपंचांचे गैरवर्तन–न्यायालय

**विदर्भ प्रजासत्ताकदि.७नांदगाव पेठ** – माहुली जहागीर येथील लाचखोर सरपंच प्रीती मनोज बुंदीले यांना अखेर लाच प्रकरणात अपात्र ठरवण्यात आले आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने विभागीय आयुक्त व ग्रामविकास मंत्रालयाचा निर्णय कायम ठेवत सरपंच प्रीती बुंदीले यांच्यावरील गैरवर्तन आणि लज्जास्पद वर्तनाचा ठपका योग्य असल्याचे स्पष्ट केले.सरपंच बनण्यासाठी शिवसेनेतून



काँग्रेस मध्ये व नंतर पद वाचविण्यासाठी काँग्रेस मधून भारतीय जनता पक्षात प्रवेश करणाऱ्या प्रीती बुंदीले यांना न्यायालयाने जबरदस्त चपराक दिली. कंत्राटदार रामभाऊ मोंढे यांना अनुभव प्रमाणपत्र मिळवण्यासाठी सरपंचाचे पती मनोज बुंदीले यांनी चार हजार रुपयांची मागणी केली होती. मात्र, लाच देण्यास नकार देत त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दाखल केली. २७ सप्टेंबर २०२३ रोजी विभागाच्या पथकाने सापळा रचत मनोज बुंदीले यांना रंगेहाथ पकडले. त्यानंतर पोलिसांनी सरपंच प्रीती बुंदीले व मनोज बुंदीले यांच्याविरुद्ध एफआयआर नोंदवला होता. या घटनेनंतर माहुली जहागीरचे माजी सरपंच व भाजपा कार्यकर्ते सुधीर बिजवे यांनी विभागीय आयुक्तांकडे सरपंचाविरोधात तक्रार दाखल केली होती.त्याअनुषंगानेविभागीय आयुक्तांनी ७ ऑगस्ट २०२४ रोजी चौकशीनंतर प्रीती बुंदीले यांना सरपंच व सदस्य पदासाठी अपात्र ठरवले.पुढे प्रीती बुंदीले यांनी भाजप प्रवेश केल्यामुळे खा. डॉ. अनिल बोंडे व स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी याप्रकरणी ग्रामविकास मंत्रालयात पाठपुरावा केल्यानंतर तत्कालीन ग्रामविकासमंत्री गिरीश महाजन यांनी आभासी पद्धतीने बैठक घेउन सरपंच प्रीती बुंदीले यांना पदावर कायम ठेवण्याचा आदेश देत विभागीय आयुक्तांच्या आदेशाला स्थगिती दिली होती. त्यानंतर नव्या सरकार मधील ग्रामविकास मंत्री जयप्रकाश गोरे यांनी याप्रकरणी १२ मार्च २०२५ रोजी सुनावणी करतांना प्रीती बुंदीले यांना पुन्हा अपात्र ठरवले. त्यामुळे प्रीती बुंदीले यांनी उच्च न्यायालयात दाद मागितली. दरम्यान, प्रीती बुंदीले यांच्याविरोधात सुधीर बीजवे यांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल करून आव्हान दिले होते. प्रीती बुंदीले यांनी न्यायालयात आपण लाच मागितली नाही आणि स्वीकारली नाही, असा दावा केला होता. मात्र न्यायालयाने हा दावा फेटाळून सरपंचाच्या पाठिंब्याशिवाय तिचा पती लाच मागूच शकत नाही असे ठाम निरीक्षण नोंदवले. न्यायमूर्ती प्रफुल्ल खुबाळकर यांच्या एकलखंडपीठाने विभागीय आयुक्त यांचा निर्णय कायम ठेवत प्रीती बुंदीले यांची याचिका फेटाळली व अपात्रतेचा आदेश दिला.२०२३ मध्ये लाचप्रकरणात अडकल्यांनंतर सुद्धा प्रीती बुंदीले यांनी मिळालेल्या स्थगिती च्या आधारे सरपंचपद भोगून त्यांनतर सुद्धा लाखो रुपयांचा भ्रष्टाचार केल्याचा आरोप गावकऱ्यांकडून होत आहे. उच्च न्यायालयाने प्रीती बुंदीले यांना सदस्य आणि सरपंच या दोन्ही पदावरून अपात्र केले आहे.त्यांनी आजवर केलेल्या भ्रष्टाचाराची चौकशी करून तातडीने त्यांच्याकडून वसुली करण्यात यावी अशी मागणी माजी सरपंच तथा भाजप कार्यकर्ते सुधीर बीजवे यांनी केली आहे.

### न्याय मिळाला



सरपंच प्रीती बुंदीले या भ्रष्ट आणि लाचखोर असल्याचे सिद्ध झाल्यानंतर सुद्धा त्या पदावर राहणे हे ग्रामपदाचा अवमान करणारे होते. मी विभागीय आयुक्तांकडे याबाबत तक्रार दाखल केली होती. अखेर निष्पक्ष चौकशीनंतर न्यायालयाने सत्याला न्याय दिला.

**सुधीर बिजवे,** तक्रारदार व माजी सरपंच, माहुली जहागीर–


# आडकुजी महाराज पुण्यतिथी महोत्सव समारोप संत महात्म्यांच्या सत्कार सोहळा

## भगवी टोपी सर्वधर्म समभावनेच प्रतिक– माजी. मंत्री यशोमती ठाकूर

**विदर्भ प्रजासत्ताक दि.७ तिवसा–**भगवी टोपी सर्वधर्म समभावनेच संदेश देणारे प्रतिक आहे हा संत महात्म्यांचा परिसर असून याला काळीमा न लागू देता असाच अबाधित नेहमी प्रमाणे राहावा. व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे विचार पेरावे असे उद्बोधन पर विचार श्री क्षेत्र वरखेड येथे श्री समर्थ आडकुजी महाराजांचे १०४ व्या पुण्यतिथी निमित्त आयोजित काल्याचे प्रसंगी बोलताना राज्याचे माजी मंत्री ड यशोमती ठाकूर यांनी मांडले

या पुण्यतिथि महोत्सव काल्याचे प्रसंगी संत सयाजी महाराज, श्री संत गणेश महाराज, श्री संत सचीन देव महाराज, रोहित महाराज, भंते अभय नायक, मुणाजी महाराज ,जनार्दन बोथे, आड कुजी महाराज संस्थानचे अध्यक्ष अभिजीत बोके, विश्वस्त विक्रम बोके, रवी मानव , सह संत महात्म्यांच्या प्रमुख उपस्थिती होती यावेळी अडकुजी महाराजांच्या हजारो भाविकांनी श्रद्धांजली अर्पण केलीप्रसंगी ह भ प मयूर महाराज.यांची काला अभंगवाणी होऊन काल्याचे महत्त्व वर प्रासंगिक उद्बोधन मान्यवरांचे झाले दरम्यान आडकुजी महाराज संस्थानचे अध्यक्ष अभिजीत बोके व विश्वस्तांच्या हस्ते निमंत्रित संत महात्म्यांचा व विविध धार्मिक संस्थांन पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला





काला व महाप्रसाद देण्यात आला यावेळी हजारो भक्तांचा जनसागर वरखेड नगरीत उसळला होता

सायंकाळी सामुदायिक प्रार्थना भाषण व ग्रामगीता ११ ओव्याचे वाचन ग्रामगीताचार्य विजयराव बोके यांनी केले.श्री समर्थ आडकुजी महाराज राष्ट्रसंत तुकडोजी महाराजनयांची पालखीची शोभायात्रा वरखेडनगरीतून काढण्यात आली.

श्री गुरुदेव समर्थ भजन मंडळ भजन संध्या रात्रौ दहीहंडी आरती प्रसाद राष्ट्रवंदनेने कार्यक्रमाची सांगता होऊन सर्व संत पालखीचे प्रस्थान व कार्यक्रमाची सांगता झाली संपूर्ण कार्यक्रमाचे संचालक विजय बोके यांनी केले.

### राष्ट्रसंतांना भारतरत्न पदवी ने सन्मानित करा

भंते अभय नायक यांनी राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांना भारतरत्न पदवी ने सरकारने सन्मानित करावे त्यासाठी गुरुदेव भक्ताने विशेष सह्याची मोहीम राबवावी सरकारकडे पाठपुरावा करावा मी सुद्धा यासाठी होणाऱ्या कार्यात सहभागी होण्याची भावना त्यांनी व्यक्त केली, तर यावेळी गंगाधर टप्पे यांचे श्री गुरुदेव विविध पैलूंचे दर्शन या पुस्तकाचा विमोचन सोहळा पार पडला

# अमरावती जिल्ह्यासाठी 'आधारभूत' खरेदी केंद्रांना मंजुरी;शेतकऱ्यांना तातडीने नोंदणीचे आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताक दि.७अमरावती** अमरावती जिल्ह्यामध्ये खरीप पणन हंगाम २०२५–२६ अंतर्गत धान (भात) आणि भरडधान्य (ज्वारी, बाजरी, इ.) खरेदी करण्यासाठी किमान आधारभूत किंमत योजनेंतर्गत एकूण १२ खरेदी केंद्रांना मंजुरी देण्यात आली आहे. खरेदी केंद्र निवड समितीचे अध्यक्ष जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी ही मान्यता प्रदान केली आहे.जिल्ह्यातील मोर्शी, वरुड, अचलपूर आणि चांदूर बाजार या तालुक्यांतील प्रत्येकी एक, अशा ४ सामान्य खरेदी केंद्रांना मंजुरी मिळाली असून, ही केंद्रे तालुका खरेदी विक्री संस्थांमार्फत चालवली जातील. याव्यतिरिक्त, धारणी आणि चिखलदरा या आदिवासी बहुल तालुक्यांतील अनुसूचित जनजाती क्षेत्रासाठी विशेषतः ८ खरेदी केंद्रांना मान्यता देण्यात आली आहे. आदिवासी विकास महामंडळामार्फत ही केंद्रे चालवली जातील. यामध्ये धारणी तालुक्यात सावलीखेडा, साद्रावाडी, धारणी, चाकर्दा, हरिसाल, बैरागड तसेच चिखलदरा तालुक्यात आणि गौलखेडा बाजार येथील केंद्रांचा



समावेश आहे. तसेच विदर्भ को–ऑपरेटिव मार्केटिंग फेडरेशन तर्फे

जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत, जिल्हा पुरवठा अधिकारी निनाद लांडे , जिल्हा मार्केटिंग अधिकारी श्री. बिसेने, विदर्भ को–ऑपरेटिव मार्केटिंग फेडरेशनचे श्री. विधळे, आदिवासी विकास महामंडळाचे संतोष आमटे यांच्यासह संबंधित विभागाचे प्रतिनिधी उपस्थित होते. यावेळी जिल्हाधिकाऱ्यांनी सर्व खरेदी प्रतिनिधींनी शासनाच्या धोरणानुसारच शेतकऱ्यांचे धान्य खरेदी करण्याचे निर्देश दिले. शेतकऱ्यांनी आपल्या शेतमालाची आधारभूत किंमतीने विक्री करण्यासाठी लवकरात लवकर शासकीय पोर्टलवर नोंदणी करावी, असे आवाहन जिल्हाधिकारी श्री. येरेकर यांनी केले आहे.

# ३२ हजार ८७४ मतदार बजावणार मतदानाचा हक्क

## मोर्शी नगर परिषद निवडणुकीची धूमशान

**विदर्भ प्रजासत्ताक दि.७मोर्शी–** नगरपरिषदेची निवडणूक २ डिसेंबरला होणार असून या निवडणुकीत एकूण १२ प्रभागातून २४ नगरसेवक व नगराध्यक्ष – पदाच्या निवडणुकीसाठी ३२ हजार ८७४ मतदान मतदानाचा हक्क बजावणार आहे.यामध्ये प्रभाग क्रमांक १ व प्रभाग क्रमांक ६ मध्ये समान पुरुष व महिलांची मतदार संख्या असून सर्वात जास्त मतदार प्रभाग क्रमांक १० मध्ये ३ हजार ४७७ एवढे असून सर्वात कमी १ हजार ८९१ मतदार संख्या प्रभाग क्रमांक ८ मध्ये आहे. या निवडणुकीत १६ हजार ४०५ पुरुष व १६ हजार




४६९ महिला मतदार मतदान करणार आहे. मागील चार वर्षापासून नगर परिषदेमधील नगराध्यक्ष व नगरसेवक पद रिक्त असल्याने होणाऱ्या निवडणुकीसाठीअनेक इच्छुकांनी बाशिंग बांधले होते मात्र आरक्षणात नगराध्यक्ष व काही प्रभागातील नगरसेवक पद हे महिला करीता राखीव झाल्याने त्यांच्या इच्छेवर पाणी फेरल्या गेले. येत्या काही दिवसातच या निवडणुकीच्या प्रचाराचा धुराळा उडणार आहे.

**पुरुष मतदारापेक्षा महिला मतदार जास्त–** यंदाच्या नगरपरिषदेच्या मोर्शी निवडणुकीत एकूण ३२ हजार ८७४ मतदार असले तरी पुरुष मतदारांची संख्या १६ हजार ४०५ एवढी असून महिला मतदारांची संख्या १६ हजार ४६९ इतकी आहे. या मतदार यादीमध्ये पुरुष मतदारांपेक्षा ६४ महिला मतदार जास्त आहे.

# भूमि अभिलेख विभागातील गट क पदांची १३ व १४ नोव्हेंबरला परीक्षा

## परीक्षेचे वेळापत्रक व प्रवेशपत्राबाबत माहिती https://mahabhumi.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध

**विदर्भ प्रजासत्ताक दि.७ अमरावती–** भूमि अभिलेख विभागातील गट क पदसमुह ४ (भूकरमापक) संवर्गातील रिक्त पदे सरळसेवेने भरण्याकरीता रोजी जाहीरात प्रसिद्ध करण्यात आली होती. त्यानुसार १ ते २४ ऑक्टोबर या कालावधीत ऑनलाईन अर्ज स्विकृतीचे कामकाज करण्यात आले असून ऑनलाईन अर्ज सादर केलेल्या उमेदवारांची ऑनलाईन परीक्षा (Computer Based Test) १३ व १४ नोव्हेंबर या कालावधीत महाराष्ट्रातील विविध केंद्रांवर घेण्यात येणार आहे, असे जमाबंदी आयुक्त आणि संचालक (भूमि अभिलेख) डॉ. सुहास दिवसे यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे कळविले आहे.

परीक्षेचे वेळापत्रक पुढीलप्रमाणे : दि. १३ नोव्हेंबर रोजी प्रथम सत्रात पुणे, अमरावती विभागांची परीक्षा होणार असुन उमेदवारांची परीक्षा केंद्रावर रिपोर्टींगची वेळ सकाळी ८.०० वाजताची राहील. त्याच दिवशी ( १३ नोव्हेंबर) द्वितीय सत्रात नाशिक व नागपूर विभागातील परीक्षा होणार असुन उमेदवारांची परीक्षा केंद्रावर रिपोर्टींगची वेळ दुपारी १२ वाजताची असेल.

दि. १४ नोव्हेंबर २०२५ रोजी, प्रथम सत्रात मुंबई (कोकण) विभागाची परीक्षा होणार असून उमेदवारांची रिपोर्टींगची वेळ सकाळी ८.०० वाजताची असेल. दुसऱ्या सत्रात छ.संभाजीनगर विभागाची परीक्षा होणार असुन उमेदवारांची रिपोर्टींगची वेळ दुपारी १२ वाजताची असेल.

परीक्षेचे विभागनिहाय वेळापत्रक व उमेदवारांचे परीक्षेच्या प्रवेशपत्राबाबत विभागाच्या अधिकृत संकेतस्थळावर https://mahabhumi.gov.in लिंक उपलब्ध करुन देण्यात आली आहे. पात्र उमेदवाराने विभागाच्या अधिकृत संकेतस्थळावर देण्यात आलेल्या सुचनांनुसार प्रवेशपत्र डाऊनलोड करुन घ्यावयाचे असून प्रवेशपत्रावर नमूद परीक्षा केंद्रावर उमेदवाराने दिलेल्या वेळेत उपस्थित राहून परीक्षा द्यावयाची आहे. परीक्षा केंद्र बदलण्याबाबतच्या कोणत्याही विनंतीचा विचार केला जाणार नाही.

परीक्षा ऑनलाईन पध्दतीने होणार असल्यामुळे उमेदवाराचे परीक्षा केंद्र हे महाराष्ट्र राज्यातील कोणत्याही जिल्हा, तालुका अथवा इतर ठिकाणी असून शकते. तसेच काही अपरिहार्य कारणास्तव परीक्षेच्या दिनांकामध्ये बदल झाल्यास त्याबाबतची माहिती विभागाच्या https://mahabhumi.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.


परीक्षा पध्दतीबाबतची सविस्तर माहिती पुस्तिका विभागाच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली असून परीक्षेचे प्रवेशपत्र डाऊनलोड करण्याकरीता लिंक विभागाच्या उपरोक्त संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येणार आहे, असे भूमि अभिलेख विभागाव्दारे प्रसिध्दी पत्रकाव्दारे कळविण्यात आले आहे.

# शिवसेनेच्या आंदोलनला यश नांदगाव- अमरावती रस्त्याच्या कामाला सुरुवात

## अमरावती यवतमाळ रोडवर पडले होते खड्डे

**विदर्भ प्रजासत्ताक दि.७नांदगाव खंडेश्वर**

अमरावती – यवतमाळ महामार्गावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडल्याने वाहन चालकांना जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत असे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रकाश मारोटकर यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता यांना घेराव करून दोन दिवसात खड्डे बुजवण्यात यावे अन्यथा रास्ता रोको आंदोलनाचा इशारा दिला होता अखेर खड्डे बुजवण्याचे कामाला सुरुवात झाली असून बहुतांश खड्डे बुजवण्याचे काम पूर्ण झाले आहे. गेल्या अनेक वर्षापासून महामार्गाचे काम करण्यात आले नसल्यामुळे अमरावती यवतमाळ महामार्गावर मोठे – मोठे खड्डे पडल्याने वाहन चालवतांना खड्डा चूकवण्याचे प्रयत्नात दररोज अपघात घडत होते वाहन चालकांचा जीव धोक्यात आला होता. नागरिकांना प्रचंड त्रास होत असल्याने शिवसेनेचे प्रकाश मारोटकर यांनी आक्रमक भूमिका घेऊन सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता यांना घेराव करून दोन दिवसात खड्डे बुजवण्यात यावे अन्यथा रास्ता रोको आंदोलन छेडू असा इशारा



दिला होता बांधकाम विभागाने तातडीने खड्डे बुजवण्याचे कामात सुरुवात करून आंदोलन थांबविण्याचे विनंती पत्र देऊन बहुतांश खड्डे बुजवण्यात आले असून शिवसेनेच्या आंदोलनाला अखेर यश प्राप्त झाले या आंदोलनात माजी उपनगराध्यक्ष निलेश इखार वासुदेव लोखंडे रवी ठाकूर शुभम रावेकर नितीन दुधे पवन शिरभाते अक्षय हिवराळे भूमेश्वर गोरे इत्यादी उपस्थित होते.अमरावती – यवतमाळ महामार्गाचे चौपदरीकरण करणे अत्यंत आवश्यक असून अनेक वर्षांपासून थातूर मातूर रस्त्याची डाग डुगी करण्यात येते. येत्या काळात या महामार्गासाठी मोठे आंदोलन करणार असल्याचे प्रकाश मारोटकर यांनी सांगितले.

# विद्यापीठात 'वंदे मातरम्' गीताचे समूहगान

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७अमरावती**

राष्ट्रभक्तीचे प्रतीक 'वंदे मातरम्' या गीताला दीडशे वर्षे पूर्ण झाले आहेत. या निमित्ताने संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीजवळ असलेल्या ध्वजस्तंभाजवळ वंदे मातरम् गीताचे सामूहिक गायन करण्यात आले. विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांच्या प्रमुख उपस्थितीत वंदे मातरम् गीताचे सामूहिक गायन करण्यात आले. थोर कवी, तत्त्वज्ञ बंकिमचंद्र चट्टोपाध्याय यांनी सन १८७५ साली वंदे मातरम् हे गीत लिहिले. भारतीय स्वातंत्र्य संग्रामामध्ये वंदे मातरम् गीताचा मोठाच प्रभाव राहिला आहे व आज शुक्रवार दि. ७ नोव्हेंबर, २०२५ रोजी या गीताला दीडशे वर्ष पूर्ण झाले आहेत. वंदे मातरम् गीताने जनमानसात देशभावना जागृत होण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावली आहे. एवढेच नव्हे, तर सैनिकांसाठी देखील वंदे मातरम् गीत एक प्रेरणास्त्रोत राहिलेले आहे. या पार्श्वभूमीवर संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात वंदे मातरम् गीताचे सामूहिक गायन करण्यात आले. यावेळी वातावरण अगदी राष्ट्रभक्तीमय झाले होते. याप्रसंगी विद्यापीठातील शैक्षणिक व प्रशासकीय विभागप्रमुख, संवैधानिक अधिकारी, कर्मचारी, शिक्षक, विद्यार्थी, विद्यार्थीनी मोठ्‌ए संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाच्या संचालक डॉ. तनुजा राऊत यांनी केले.



# देशभक्तीचा उत्साह, ऐक्य आणि राष्ट्रीय अभिमानाची अनुभूती

## भारत माता स्तुतीच्या गौरव दिनानिमित्त वंदे मातरम् गीताचे सामूहिक गायन



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७ अमरावती**

'वंदे मातरम्' राष्ट्रगीताच्या १५० वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त आज सामुदायिक वंदे मातरम् गीत गायनाचा कार्यक्रम जिल्हाधिकारी कार्यालय येथे पार पडला. जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्या उपस्थितीत 'वंदे मातरम्' या राष्ट्रभावना जागवणाऱ्या गीताचे उपस्थित अधिकारी, कर्मचारी यांनी एकसुरात सामूहिक गायन करण्यात आले.यावेळी अतिरिक्त जिल्हाधिकारी गोविंद दानेज, निवासी उपजिल्हाधिकारी अनिल भटकर, उपजिल्हाधिकारी विवेक जाधव, उपजिल्हा निवडणूक अधिकारी शिवाजी शिंदे, तहसीलदार विजय लोखंडे, निलेश खटके, तसेच विविध कार्यालयांचे प्रमुख, शासकीय अधिकारी, कर्मचारी, स्वयंसेवी संस्थेचे प्रतिनिधी यावेळी उपस्थित होते. देशभक्तीचा उत्साह, ऐक्य आणि राष्ट्रीय अभिमान यांची अनुभूती सर्वांना यावेळी आली.स्वातंत्र्य सेनानी व थोर कवी बंकिमचंद्र चटर्जी यांनी क्रांतीची जाज्वल्य ज्योत आपल्या गीतातून सबंध देशभर पेटवली. 'वंदे मातरम्' या गीत रचनेला १५० वर्षे पूर्ण झाली आहेत. त्यानिमित येथील संत गाडगेबाबा शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या क्रीडांगणावर हजारो विद्यार्थी, तरुणांच्या उपस्थितीत 'वंदे मातरम्' गायनाचा सामूहिक सोहळा संपन्न झाला. यावेळी मुलांनी देशभक्तीपर लघू नाटिका सादर केली, तर मुलींनी लेझीम पथक सादर केले.खासदार डॉ. अनिल बोंडे, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालयाचे सहसंचालक अनंत सोमकुवर, प्राचार्य अनिल बोरकर, प्राचार्य राजेश शेळके, तहसीलदार विजय लोखंडे आदी उपस्थित होते.यावेळी प्रमुख वक्त्या पायल किनाके यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. संत गाडगेबाबा औद्योगिक प्रशिक्षण संस्था, अमरावती, भगिनी निवेदिता मुलींची औद्योगिक प्रशिक्षण संस्था अमरावती, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, रहाटगाव येथील शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते. निदेशक प्रकाश गंडोधर यांनी सूत्रसंचालन केले.

# इंधन, भाजीपाला अनुदानाची रक्कम मुख्याध्यापकांच्या खात्यात जमा

## शिक्षण विभागाची माहिती : प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजना

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७अमरावती**



शाळांमधून इयत्ता पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांना देण्यात येत असलेल्या मध्यान्ह भोजनाच्या प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेच्या माहे जून ते ऑगस्टपर्यंतच्या अनुदानाची रक्कम मुख्याध्यापकांच्या खात्यात जमा करण्यात आली आहे, अशी माहिती शिक्षण विभागाच्या वतीने देण्यात आली.स्थानिक स्वराज्य संस्था तसेच खासगी अनुदानित शाळांमध्ये इयत्ता पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांना प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेंतर्गत दररोज मध्यान्ह भोजन दिल्या जाते. योजनेसाठी आवश्यक धान्य व धान्यादी मालाचा पुरवठा शासनामार्फत होत असतो. परंतु, इंधन, भाजीपाला व पूरक आहाराचा खर्च मात्र शाळा व्यवस्थापन समितीला महिन्या अखेरीस उपलब्ध करून दिल्या जातो. इयत्ता पहिली ते पाचवीकरिता प्रतिविद्यार्थी २.५९ रुपये तर इयत्ता साहावी ते आठवीकरिता प्रतिविद्यार्थी ३.८८ रुपये अनुदान अनतेय असते शासनाकटन हानिधी शाळांना उपलब्ध होईपर्यंत हा सर्व खर्च मुख्याध्यापकांना आपल्याजवळून करावा लागतो. मागील जून महिन्यापासून चार महिन्यांचे अनुदान थकीत असल्याने या योजनेचा खर्च मुख्याध्यापकांना आपल्या खिशातून करावा लागला. दरम्यान, माहे जून ते ऑगस्टपर्यंतच्या अनुदाची रक्कम संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकांच्या खात्यावर जमा करण्यात आली आहे. तसेच माहे सप्टेंबरचे देयक सध्यस्थितीत कार्यवाहीमध्ये असून मंजुरी प्राप्त होताच मुख्याध्यापकांच्या खात्यात अनुदानाची रक्कम जमा करण्यात येईल, अशी माहिती शिक्षण विभागाकडन देण्यात आली.

# कापूस वेचणीला मजुरांची वानवा, उत्पादक अडचणीत




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. ७ पथ्रोट**

परिसरात कापूस वेचणीसाठी मजूर मिळत नसल्याने शेतकरी त्रस्त झाले आहेत. एक किलो कापूस वेचणीसाठी बारा रुपये मोजावे लागत असून, मजुरांना शेतात ने आण करण्याची करण्याची व्यवस्थाही मालकांना करावी लागत आहे. दरम्यान वेचणीस आलेला कापूस पावसामुळे भिजला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत आहे. यावर्षी परिसरात मोठ्या प्रमाणात लागवड झालेला कापूस वेचणीस आला आहे. कापसाचीच पहिली वेचणी सध्या होत आहे.कापूस चांगला फुटला: मात्र दहा रुपये किलो दरानेसुध्दा मजूर मिळत नसल्याने शेतकरी हतबल झाला आहे.संत्रा तोडणीच्या मजुरांना हजार ते अकराशे रुपये रोजदारी मिळत असल्याने मजूर कापूस वेचणीला येत नसल्याची माहिती आहे. वेचणीवाचून शेतात उभ्या असलेल्या कापसावर चोरांनी डल्ला मारण्याची भीती शेतकऱ्यांना सतावत आहे. अस्मानी, चोरी अशा संकटाने शेतकरी अडचणीत सापडला आहे. कापूस वेचणीसाठी सधन शेतकरी प्रतिकिलोस १० ते १२ रुपये देऊन मजुरांना शेतात जाण्यासाठी वाहनांची व्यवस्था करत आहे अल्पभूधारक शेतकरी हे करू शकत नाही. परिणामी त्याचा कापूस वेचणीअभावी तसाच शेतात पडून राहत आहे. दिवसभर शेतात काम करून दमूनभागून आलेल्या शेतकऱ्याला रात्री पुन्हा शेतात राखणदारी करण्याची वेळ आली आहे.

# शिक्षकाने विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती परस्पर हडपली

## पंचायत समितीकडून चौकशी सुरू



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७धारणी**

धारणी पंचायत समिती अंतर्गत असलेल्या गोंडवाडी जि. प. पूर्व माध्यमिक शाळेतील शेकडो आदिवासी विद्यार्थ्यांना महाराष्ट्र शासनाच्या आदिवासी प्रकल्प कार्यालय धारणीमार्फत देय असणार्या सुवर्ण महोत्सवी शिष्यवृत्तीची रक्कम परस्पर काढून आर्थिक गैरव्यवहार करणार्या शिक्षकाविरुद्ध कारवाई झालेली नसल्याने शिक्षण क्षेत्रात असंतोष पसरलेला आहे.

तालुक्यातील गोंडवाडी पूर्व माध्यमिक शाळेत १ ते ८ वर्ग असून शंभरावर विद्यार्थी शिक्षण घेतात. शाळा प्रशासनाने प्रती वर्ष हजार रुपये आणि दिड हजार रुपये देय असलेले शिष्यवृत्तीचे पैसे विद्यार्थ्यांना न देता शाळा समितीच्या काही सदस्यांच्या संगनमताने हडपून घेतले. आदिवासी विकास विभागाद्वारे १ ते ४ वर्गातील आदिवासी विद्यार्थ्यांना एक हजार तर ५ ते आठवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना पंधराशे रुपये वार्षिक प्रमाणे देण्यात येत असतात. सुवर्ण महोत्सवी आदिवासी शिष्यवृत्ती योजनेतील हा पैसा सरळ विद्यार्थ्यांना देण्याची आवश्यकता असते. मात्र, संबंधित शिक्षकाने शाळा समितीच्या सदस्यांना हाताशी घेऊन पैसे विद्यार्थ्यांना न देता परस्पर काढून गैरव्यवहार केल्याने एकच खळबळ उडालेली आहे.

माहितीप्रमाणे, संबंधित शिक्षकाने शाळेतील अनेक इलेक्ट्रॉनिक उपकरणे आणि किचन साहित्य व इतर शैक्षणिक साहित्याची परस्पर व्हिलेवाट करून मोठा आर्थिक गैरव्यवहार केल्याची माहिती आदिवासी पालकांनी दिलेली आहे. महाराष्ट्र शासनातर्फे गरीब आदिवासी विद्यार्थ्यांच्या पालकांवर असलेल्या शैक्षणिक खर्चाचा बोजा कमी करण्यासाठी शिष्यवृत्ती योजना राबविण्यात येत असते. सुवर्ण महोत्सवी शिष्यवृत्ती योजनेमुळे शाळाबाह्य मुलांना व नियमित शिक्षण घेणार्यांना प्रोत्साहन मिळत असते. याशिवाय आदिवासी पालकांना सुद्धा शिक्षणाची आवड निर्माण होऊन घरात शैक्षणिक वातावरण निर्माण होण्यास मदत होते. मात्र, धारणी पं. स. अंतर्गत गोंडवाडीसह काही ठळक शाळांमधून शिष्यवृत्तीची रक्कम हडपण्याचे कृत्य झालेले आहे. गोंडवाडी शाळा एक उदाहरण समजून इतर शाळांची तपासणी स्वतंत्र पथकाद्वारे करण्याची गरज आहे. गोंडवाडी शाळेचे केंद्र प्रमुख किंवा गट शिक्षणाधिकारी यांना वगळून इतरांद्वारे चौकशीची गरज आहे.

### चौकशी सुरू आहे

धारणीच्या गटविकास अधिकार्यांना या विषयी विचारणा केली असता गोंडवाडी शाळेतील गैरव्यवहाराची चौकशी सुरू असल्याचे सांगण्यात येऊन लवकरच अहवाल प्राप्त झाल्यावर कारवाई करण्याचे संकेत मिळाले.

# चांदूरबाजार नगराध्यक्षासाठी होणार तिरंगी लढत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.चांदूरबाजार**




मागील अनेक वर्षापासून स्थानिक स्वराज्य संस्था अंतर्गत येणाऱ्या नगर पंचायत व नगर परिषद यांच्या निवडणुका रखडल्या होत्या. दरम्यान न्यायालयाच्या आदेशानंतर निवडणूक आयोगाने निवडणुकीची तयारी पूर्ण केली व त्यातच ४ नोव्हेंबर रोजी नगरपरिषद व नगरपंचायत निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला असल्याने चांदूरबाजार शहरामध्ये निवडणुकीचे इच्छुक उमेदवारांमध्ये उत्सुकतेचे वातावरण दिसून आल्याने या मतदारसंघात अध्यक्षपदाच्या लढतीसाठी तिरंगी लढत होणार असल्याचे सुरुवातीपासूनच स्पष्ट दिसून येत आहे.

येत्या १० नोव्हेंबरपासून नामनिर्देशन दाखल करण्याच्या निवडणुकीची घोषणा होताच इच्छुक लागले कामाला लागले असून २ डिसेंबर रोजी मतदान प्रक्रिया पार पडणार आहे दरम्यान निवडणुकीची घोषणा होताच इच्छुक कामाला लागले असून

काँग्रेस, भाजप, प्रहार व काही या राजकीय पक्षांचे पुढारीही समीकरण जुळविण्यात व्यस्त झाले आहेत. राज्यातील नुकत्याच मतदानाच्या तारखा जाहीर करण्यात आल्या आहेत. त्यासाठी २ डिसेंबर रोजी मतदान होणार असून त्याचा निकाल ३ डिसेंबर रोजी जाहीर होणार आहे.घेण्यात येणार आहे. एकदरीत दिवाळीपूर्वीच निवडणुकीची चाहूल लागल्याने इच्छुकांनी सोशल मीडिया तसेच होर्डिंग बॅनरच्या माध्यमातून प्रचारावा धुराळा सुरू केला होता. त्यातच आता निवडणूक आयोगाने निवडणुकीची घोषणा केल्याने इच्छुक कामाला लागले असून खऱ्या अर्थाने चांदूरबाजार नगरपरिषदेच्या निवडणुकीच्या रणसंग्रामाला सुरुवात झाली असल्याने ही निवडणुक काँग्रेस, भाजप व प्रहार यांच्यामध्येच तिरंगी लढत होण्याची शक्यता दिसून येत आहे.

### उमेदवारांच्या खर्चात वाढ

यंदा नगरपालिका आणि नगरपंचायत निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारांसाठी खर्च मर्यादा वाढविण्यात आली आहे. त्यानुसार नगरपालिकांच्या अध्यक्षपदासाठी १५ लाखांची मर्यादा, तर नगरसेवक पदासाठी ७ लाखांची बाजारआली आहे. मतदाराच्या सोयीसाठी नवीन ॲपची निर्मिती करण्यात आली आहे.

### चांदूरबाजार शहर झाले होर्डिंगमुक्त

राज्य निवडणूक आयोगाने स्थानिक स्वराज्य संस्थेतर्गत नगरपरिषद व नगरपंचायतचा निवडणूक कार्यक्रम जाहीर केला. हा कार्यक्रम जाहीर होताच आदर्श आचारसंहिता लागू करण्यात आली. याची खबरदारी घेत नगरपरिषद क्षेत्रातील होर्डिंग काढण्यात आल्या. परिणामी चांदूरबाजार शहर होर्डिंगमुक्त दिसून आले. किमान ३ डिसेंबरपर्यंत शहर होर्डिंगच्या विळख्यात मुक्त राहणार आहे.

# पूर्णा नदीपात्रातील अवैध वाळूउपसा; माफियांच्या दादागिरीने शेतकरी त्रस्त, पोलिसांकडे निवेदन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७ भातकुली**

खोलापूर पोलीस स्टेशन हद्दीतील चंडीकापूर परिसरात पूर्णा नदीपात्रातून मोठ्या प्रमाणात अवैध वाळूउपसा सुरू असून वाळू माफियांच्या वाढत्या दादागिरीमुळे स्थानिक शेतकरी प्रचंड त्रस्त झाले आहेत. माफियांकडून रात्री-अपरात्री मोठ्या गाड्यांद्वारे चोरटी वाहतूक केली जात असून, या दरम्यान शेतीकडे जाणारे रस्ते फोडले जात आहेत. ट्रॅक्टर-ट्रॉलींच्या सततच्या दबावामुळे शेती पिकांचेही मोठे नुकसान होत असल्याची तक्रार शेतकऱ्यांनी केली आहे.

या संदर्भात शेतकऱ्यांनी अनेक वेळा तहसीलदार, दर्यापूर यांना निवेदन दिले, मात्र कोणतीही दखल न घेतल्याने संतप्त शेतकऱ्यांनी अखेर खोलापूर पोलीस स्टेशनमध्ये ठाणेदारांना निवेदन सादर केले. अवैध वाळू उपसा थांबवून माफियांवर कठोर कारवाई करण्यात यावी, अन्यथा कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास प्रशासन जबाबदार राहील, असा इशारा शेतकऱ्यांनी दिला आहे.स्थानिक नागरिक आणि शेतकरी वर्गाकडून या गंभीर प्रश्नावर तातडीने कारवाईची मागणी होत आहे.

# खा.बळवंत वानखडे, आ.गजानन लवटेकडून आचारसंहितेचे उल्लंघन

## दर्यापूर पंचायत समितीच्या इमारतीचे केले भूमिपूजन : भाजपच्या नकुल सोनटक्के यांची मुख्य निवडणूक आयुक्तांकडे तक्रार : खा. डॉ.अनिल बोंडे यांच्या कामाचं श्रेय घेत असल्याचाही केला आरोप



मुख्य निवडणूक आयुक्तांकडे यासंदर्भात तक्रार दाखल करून गुन्हे नोंदवण्याची मागणी केली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे सतत पाठपुरावा करून खासदार डॉ.अनिल बोंडे यांनी पंचायत समितीची नूतन इमारत मंजूर करून घेतली. असं असतानाही परस्पर कामाचं श्रेय घेण्यासाठी आचार सहिता लागल्यावर भूमिपूजन करणे हे नियमबाह्य आहे.



**नकुल सोनटक्के,**
**जिल्हाध्यक्ष भाजपा अनुसूचित जाती मोर्चा**

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७दर्यापूर**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, खासदार डॉ.अनिल बोंडे यांच्या प्रयत्नातून मंजूर झालेल्या दर्यापूर पंचायत समितीच्या इमारतीचे श्रेय घेण्याचा प्रयत्न करत खासदार बळवंत वानखडे, आमदार गजानन लवटे यांच्यासह काँग्रेस पदाधिकाऱ्यांकडून आदर्श आचारसंहिता लागू झाल्यावर दर्यापूर पंचायत समितीच्या नूतन इमारतीच्या कामाची भूमिपूजन केल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे. यासंदर्भात भाजपच्या अनुसूचित जाती विभागाचे जिल्हाध्यक्ष नकुल सोनटक्के यांनी यावर तीव्र आक्षेप घेतला असून मुख्य निवडणूक आयुक्तांकडे तक्रार करत संबंधितावर गुन्हे दाखल करण्याची मागणी केली आहे.

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीच्या अनुषंगाने महाराष्ट्र निवडणूक आयोगाने चार नोव्हेंबर २०२५ रोजी दुपारी चार वाजता पत्रकार परिषद घेऊन आदर्श आचारसंहिता लागू केली.अमरावती जिल्ह्यातही नगरपरिषद, नगरपालिका क्षेत्रात आचारसंहिता लागू केल्यानंतर खासदार बळवंत वानखडे, आमदार गजानन लवटे, काँग्रेसचे तालुकाध्यक्ष सुधाकर भारसाकळे यांच्यासह काँग्रेसचे पदाधिकारी व उद्धव ठाकरे गटाचे पदाधिकारी यांनी दर्यापूर पंचायत समितीच्या नवीन इमारतीच्या कामाची भूमिपूजन केले. भूमिपूजनाचे बोर्ड उभारने, शासकीय जागेचा व साधनांचा वापर करणे, लोकप्रतिनिधींची जाहीर उपस्थिती दर्शवणे ही सर्व कृती आदर्श आचारसंहिता नियम ७, १०, १६ चे उल्लंघन करणारी आहे. संदर्भातील तक्रार भाजपच्या अनुसूचित जाती विभागाचे जिल्हाध्यक्ष नकुल सोनटक्के यांनी मुख्य निवडणूक आयुक्त महाराष्ट्र राज्य यांच्याकडे केली आहे. त्यामुळे संबंधितांवर आदर्श आचारसंहिता भंग केल्याचे गुन्हे दाखल करावे अशी मागणी देखील त्यांनी केली आहे.

# रक्तरंजित धाडसी हत्या

## युवकावर चाकूचे अनेक घाव; पेट्रोल टाकून मृतदेह जाळला; शिराळा शेतशिवार हादरले



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७वलगाव**

वलगाव-चांदूरबाजार महामार्गालगतच्या शिराळा शेतशिवारात आज शुक्रवार सकाळी उघडकीस आलेल्या निर्घृण हत्याकांडाने परिसर हादरून गेला आहे. ओळख पटू न शकणाऱ्या एका तरुणाची क्रूर पद्धतीने हत्या करून त्याचा मृतदेह पेट्रोल टाकून जाळून टाकण्यात आला आहे. मृतकाच्या शरीरावर चाकूचे मोठ्या प्रमाणात घाव असून यातून ही घटना अत्यंत रागाच्या भरात किंवा सूडातून झाल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे.

या परिसरातील शेतातील मजूर सकाळी कामासाठी शेतात पोहोचले असता त्यांना जळालेल्या अवस्थेत मृतदेह दिसला असता त्यांनी तात्काळ ही माहिती वलगाव पोलिसांना दिली. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली असून डॉग स्क्वॉड, फॉरेन्सिक पथक यांनाही बोलावून सखोल तपास सुरू करण्यात आला आहे. मृतकाच्या हातावर गोंदवलेले नाव असल्याचे आढळले; मात्र खुनी किंवा खुनींनी मृतदेह जाळताना ते देखील मुद्दाम नष्ट करण्याचा प्रयत्न केला असल्याचे पोलिसांनी सांगितले.

डीसीपी गणेश शिंदे यांनी प्राथमिक माहिती देताना सांगितले की, मृतदेहावर चाकूचे अनेक घाव असून जळालेल्या अवस्थेत तो आढळला आहे. मृतकाची ओळख पटविण्यासाठी सर्व शक्यता तपासल्या जात आहेत. हा गुन्हा अत्यंत नियोजनबद्ध दिसत आहे. घटनास्थळी मिळालेल्या काही पुराव्यांवरून तपासाची दिशा ठरवली जात आहे.

हत्या नेमकी कुठे झाली? मृतदेह त्याच ठिकाणी जाळण्यात आला की अन्यत्रून आणून टाकण्यात आला? या सर्व प्रश्नांची उत्तरे मिळण्यासाठी पोलिस विविध कोन तपासत आहेत. परिसरातील सीसीटीव्ही फुटेज, मोबाईल लोकेशन, आणि मागील काही दिवसांतील हरवलेल्या व्यक्तींची नोंद या सर्वांचा तपासात समावेश करण्यात आला आहे.

दरम्यान, ओळख पटत नसल्याने मृतक कोण, कुठल्या कारणातून ही हत्या झाली, किती जणांनी मिळून हा गुन्हा केला-यावर अद्यापही पडदा आहे. वलगाव पोलीस पुढील तपास करीत आहेत.

# राज्यभरातील शाळा २४ नोव्हेंबरला बंद

## टीईटी सक्तीविरोधात शिक्षक संघटना यांनी घेतला निर्णय?



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७अमरावती**

राज्यातील विविध शिक्षक संघटनांच्या संयुक्त पुढाकाराने मंगळवारी (ता. ४) रावसाहेब पटवर्धन विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय पुणे येथे राज्यभरातील शिक्षकांच्या गंभीर प्रश्नांवर विचारविनिमय बैठक आयोजित करण्यात आली होती.'सर्वोच्च न्यायालयाच्या १ सप्टेंबरच्या शिक्षक पात्रतापरीक्षा (टीईटी) सक्तीच्या निर्णयाविरोधात राज्य शासनाने तातडीने पुनर्विचार याचिका दाखल करावी आणि केंद्र शासनाकडे याबाबत पाठपुरावा करावा. दोन आठवड्याच्या आत याबाबत कार्यवाही झाली नाही, तर २४ नोव्हेंबर रोजी राज्यभरातील शिक्षक शाळा बंद आंदोलन करतील,' असा इशारा महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघटना व महाराष्ट्र राज्य महानगरपालिका व नगरपालिका प्राथमिक शिक्षक संघटना यांनी मंगळवारी दिला.दरम्यान, आंदोलनानंतरही पुनर्विचार याचिका दाखल झाली नाही, तर संघटना थेट सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करणार असल्याचे यावेळी जाहीर केले. कार्यकारी अध्यक्ष सचिन डिंबळे,प्राथमिक शिक्षक समितीचे पदाधिकारी उदय शिंदे,शिक्षक संघाचे संभाजी थोरात, शिक्षक आणि शिक्षकेत्त संघटनेचे राज्यनेते शिवाजीराव खांडेकर , राज्य शिक्षक समिती चे सरचिटणीस मा. राजनजी कोरगावकर , राज्य शिक्षक समिती चे कोशाध्यक्ष मा. नंदकुमार होळकर , राज्य शिक्षक समिती उपाध्यक्ष मा. राजनजी सावंत , राज्य शिक्षक संघांचे मुख्य सल्लागार मा. मधुकर काठोळे , राज्य जुनी पेन्शन हक्क संघटनेचे मा. वितेशजी खांडेकर , मा फाफाळे सर , राज्य शिक्षक संघ .. महानगरपालिका राज्य अध्यक्ष मा. सचिनजी डिंबळे , राज्य शिक्षक परिषदेचे अध्यक्ष मा. पन्हाळे सर , मुख्याध्यापक संघांचे मा. कामथे सर , मा. जगताप सर , मा. जोशी सर , शिक्षक सेना संघटना प्रतिनिधी ,स्वराज्य शिक्षक संघटना राज्य पदाधिकारी , शिक्षण सेवक संघटना राज्य प्रतिनिधी , शिक्षक सेना संघटना राज्य प्रतिनिधी , संस्था चालक माध्यमिक संघटना राज्य प्रतिनिधी , पुणे शहर प्राथमिक , माध्यमिक शिक्षक संघटना प्रतिनिधी , राज्य शिक्षक काँग्रेस पदाधिकारी यांच्या सह... २६ राज्य शिक्षक संघटना ... प्राथमिक आणि माध्यमिक प्रतिनिधी आणि पुणे जिल्हा शिक्षक समिती सरचिटणीस संदीपआप्पा जगताप आणि अनेक राज्य संघटना प्रतिनिधी उपस्थित होते.

सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचा विपर्यास करून शिक्षकांना लक्ष्य केले जात आहे. राज्य शासनाच्या या निर्णयामुळे शिक्षकांमध्ये प्रचंड असंतोष पसरला असून, चुकीचे संदर्भलावून शिक्षकांवर कारवाया करण्यात येत आहे, असा आरोप शिक्षक संघटना पदाधिकारी यांनी केला.'त्यामुळे राज्य सरकारने तातडीने हस्तक्षेप करून शिक्षकांना लक्ष्य करण्याच्या घटना थांबविणे अपेक्षित असून अनेक अनुभवी शिक्षकांना टीईटी नसल्याने नोकरीवर धोका निर्माण झाला आहे. ही बाब शिक्षकांच्या मनोधैर्यावर परिणाम करणारी आहे. या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने याबाबत त्वरित हस्तक्षेप करावा, अन्यथा शिक्षक रस्त्यावर उतरून २४ नोव्हेंबर रोजी राज्यभरात शाळा बंद आंदोलन करण्यात येईल. आंदोलन हा आमचा अंतिम पर्याय नाही, पण शासनाने दखल घेतली नाही, तर आम्हाला हा मार्ग स्वीकारावा लागेल,' असे उदय शिंदे यांनी नमूद केले.

'टीईटी' सक्तीचा निर्णय लागू करताना अनुभवी शिक्षकांना संरक्षण देण्यात यावे, त्यांच्या सेवा-सुविधांवर गदा येऊ नये, अन्यथा शिक्षण क्षेत्रात मोठा असंतोष उसळेल. याबाबत गांभीर्याने विचार करून त्वरित पावले उचलावीत, असे आवाहन शिक्षक संघटनांनी केले असल्याचे सांगण्यात आले.असे प्राथमिक शिक्षक समितीचे राज्य प्रसिध्दी प्रमुख राजेश सावरकर यांनी कळविले आहे.

# अमरावती महानगरपालिकेत 'वंदे मातरम्'चा निनाद

## अधिकारी, कर्मचाऱ्यांचा उत्साही सहभाग



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७अमरावती**

राष्ट्रभावनेचा आणि देशभक्तीचा अद्वितीय संगम घडवून आणत आज अमरावती महानगरपालिकेत 'वंदे मातरम्' गीताच्या १५० व्या वर्धापन दिनानिमित्त एक भव्य कार्यक्रम पार पडला. विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृहात सकाळी ११.०० वाजता झालेल्या या विशेष सोहळ्यात महानगरपालिकेचे अधिकारी, कर्मचारी आणि नागरिक मोठ्या उत्साहात सहभागी झाले.सर्व उपस्थितांनी एकसुरात वंदे मातरम् या राष्ट्रगीताचे सामूहिक गायन केले. सभागृहात देशभक्तीचा जयघोष घुमत असताना वातावरणात उत्साह, एकात्मता आणि अभिमानाची भावना दाटून आली.या प्रसंगी महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक सौम्या शर्मा चांडक यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, 'वंदे मातरम्' हे केवळ एक गीत नाही, तर ते आपल्या स्वातंत्र्य संग्रामाचे प्रेरणास्थान आहे. हे गीत आपल्याला राष्ट्रनिष्ठा, एकता आणि त्यागाची जाणीव करून देते. प्रत्येक भारतीयाने या गीताचा अभिमान बाळगावा आणि त्यातील मूल्ये आचरणात आणावीत.कार्यक्रमाला अतिरिक्त आयुक्त महेश देशमुख, अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक, उपायुक्त योगेश पिठे, उपायुक्त डॉ. मेघना वासनकर, मुख्यलेखापरिक्षक श्यामसुंदर देव, मुख्यलेखाधिकारी दत्तात्रय फिस्के, सहाय्यक नगर रचना अधिकारी सागर वानखडे, शहर अभियंता रविंद्र पवार, सहाय्यक आयुक्त भुषण पुसतकर, सहाय्यक आयुक्त नंदकिशोर तिखिले, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ.विशाल काळे, वैद्यकीय अधिकारी (स्वच्छता) डॉ.अजय जाधव, सहाय्यक आयुक्त श्रीकांतसिंह चौहान, शिक्षणाधिकारी डॉ.प्रकाश मेश्राम, अतिक्रमण विभागाचे सहाय्यक आयुक्त अविनाश रघटाटे, उद्यान अधिक्षक अजय विंचुरकर, सहाय्यक निवडणूक अधिकारी अक्षय निलंगे, उपअभियंता, अभियंता यांच्यासह अनेक अधिकारी, कर्मचारी आणि नागरिक उपस्थित होते.या उपक्रमातून अमरावती महानगरपालिकेने राष्ट्रगीताच्या गौरवशाली इतिहासाला अभिवादन करत, नागरिकांमध्ये देशभक्तीची भावना दृढ करण्याचा संदेश दिला.महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक सौम्या शर्मा चांडक यांनी या प्रसंगी आपल्या भाषणात सांगितले की, 'वंदे मातरम्' हे केवळ एक गीत नसून भारताच्या आत्म्याचे प्रतीक आहे. हे गीत राष्ट्रप्रेम, एकता आणि त्यागाच्या भावनेचे द्योतक असून स्वातंत्र्य संग्रामाच्या प्रत्येक टप्प्यावर याने असंख्य भारतीयांना प्रेरणा दिली.त्या म्हणाल्या, आज आपण ज्या स्वातंत्र्याचा आणि प्रगतीचा आनंद घेतो, तो त्या वीरांच्या बलिदानामुळे शक्य झाला, ज्यांनी 'वंदे मातरम्'च्या घोषणेतून प्रेरणा घेतली. या गीताचे उच्चारण हे मातृभूमीप्रतीच्या निष्ठेचे प्रतीक आहे. त्यामुळे प्रत्येक भारतीयाने या गीताचा अभिमान बाळगावा आणि त्यातील मूल्यांना आपल्या जीवनात उतरवावे.आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी पुढे सांगितले की, आजच्या आधुनिक युगात देशभक्तीची भावना जागविणे आणि युवकांना आपल्या सांस्कृतिक वारशाची जाणीव करून देणे अत्यंत आवश्यक आहे. अशा सामूहिक उपक्रमांमधून राष्ट्रभावना अधिक दृढ होते आणि समाजात एकता, सौहार्द आणि आपलेपणा वाढतो, असे त्या म्हणाल्या.त्यांनी सर्व अधिकारी, कर्मचारी आणि नागरिकांचे या उपक्रमात सहभागी होऊन देशभक्तीचा संदेश दिल्याबद्दल अभिनंदन केले. महानगरपालिका केवळ शहराच्या विकासासाठी नव्हे, तर नागरिकांच्या मनामनात राष्ट्रनिष्ठा आणि सामाजिक जबाबदारीची भावना रुजविण्यासाठीही कटिबद्ध आहे, असे आयुक्तांनी नमूद केले.

# विभागीय आयुक्त कार्यालयात 'वंदे मातरम्' गीताचे समूहगान

## 'वंदे मातरम्' गीताच्या 'सार्ध शताब्दी' महोत्सवास सुरुवात



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७अमरावती**

राष्ट्रभक्तीचे प्रतीक 'वंदे मातरम्' या गीताला दीडशे वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने विभागीय आयुक्त कार्यालयात राष्ट्रभक्तीच्या वातावरणात 'वंदे मातरम्' गीताचे आज सामूहिक गायन करण्यात आले.

विभागीय आयुक्त डॉ. श्वेता सिंघल यांच्या अध्यक्षतेखाली विभागीय आयुक्त कार्यालयाच्या सभागृहात आयोजित या कार्यक्रमास अपर आयुक्त सुरज वाघमारे, अजय लहाने, उपायुक्त संतोष कवडे, रविंद्र हजारे, राजीव फडके, सहाय्यक आयुक्त वैशाली पाथरे, तहसीलदार प्रज्ञा काकडे यांच्यासह विविध विभागांचे प्रमुख, अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

भारताच्या स्वातंत्र्य संग्रामात 'वंदे मातरम्' या गीताचा विशेष उल्लेखनीय प्रभाव राहिला आहे आणि हे गीत स्वातंत्र्यसैनिकांसाठी प्रेरणास्त्रोत बनले होते. सर्व जनमानसात देशभावना जागृत होण्यासाठी या गीताने महत्त्वाची भूमिका बजावलेली आहे. थोर कवी आणि तत्वज्ञ बंकिमचंद्र चट्टोपाध्याय यांनी १८७५ साली रचलेल्या 'वंदे मातरम्' या गीताला शुक्रवारी, ७ नोव्हेंबर रोजी १५० वर्ष पूर्ण झाल्याच्या निमित्ताने ७ नोव्हेंबर २०२५ ते ७ नोव्हेंबर २०२६ या दरम्यान एकूण चार टप्प्यात राज्यात विविध उपक्रम व कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे.

याअंतर्गत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत मुंबई येथे मंत्रालयात 'वंदे मातरम्' गीत 'सार्ध शताब्दी' महोत्सवासाची आज सुरुवात झाली आहे. या महोत्सवासाच्या माध्यमातून कौशल्य विकास विभाग आणि सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्यावतीने राज्यभरात वर्षभर विविध कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहेत.

# नगरपरिषद निवडणुकांसाठी काँग्रेस सज्ज

## उमेदवार निवड प्रक्रियेला उत्स्फूर्त प्रतिसाद




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७ अमरावती**

अमरावती जिल्ह्यातील दहा नगरपरिषद व दोन नगरपंचायतींच्या निवडणुकीला आता वेग आला असून या पार्श्वभूमीवर काँग्रेस पक्षाने रणशिंग फुंकले आहे.नगराध्यक्ष आणी नगरसेवक पदासाठी इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती आज अमरावती येथील काँग्रेस भवनमध्ये घेण्यात आल्या.या मुलाखतींना प्रचंड प्रतिसाद मिळाला असून अमरावती जिल्हाभरातून एक हजार जास्त इच्छुकांनी उपस्थित राहून आपली मुलाखत दिली. या वेळी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष बबलू देशमुख, माजी मंत्री व काँग्रेस नेत्या यशोमती ठाकूर,तसेच खासदार बळवंत वानखडे यांच्या उपस्थितीत उमेदवारांची निवड प्रक्रिया पार पडली.

अमरावती जिल्ह्यातील सर्वच नगरपरिषद नगरपंचायत वर काँग्रेस पक्षाची सत्ता स्थापन होईल असा विश्वास काँग्रेस पदाधिकाऱ्यानी यावेळी व्यक्त केला काँग्रेसच्या या उपक्रमामुळे पक्ष कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून आगामी नगरपरिषद निवडणुकांसाठी पक्ष संघटन सज्ज झाल्याचे चित्र दिसत आहे. पक्षाच्या प्रदेश नेतृत्वाकडून या मुलाखतींच्या आधारे लवकरच उमेदवारांची अंतिम यादी जाहीर केली जाण्याची शक्यता आहे.


आता आपल्या मोबाईल वरच वाचा
राज्यासह जिल्ह्यातील महत्वाच्या घडामोडी
Q R कोड स्कॅन करा व आमच्या ग्रुप ला जॉईन व्हा!
प्रिंट
पिडीएफ
ई- पेपर
वेबपोर्टल
दररोज रात्री 8 वाजता वाचा
निवांत!!
सांध्य दैनिक
विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on
राजकीय,सामाजिक,कृषी,शैक्षणिक,क्रीडा,क्राईम
विश्वातील सर्व घडामोडी वाचा आता आमच्या सोबत